**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११



jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज



**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सितराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०९ | मंगळवार, दि. १० जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संमिश्र

### पीओपी गणेश मूर्तींवरील बंदी रद्द

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : यंदाच्या गणेशोत्सवापूर्वी मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने प्लास्टर ऑफ पॅरिस गणेश मूर्ती तयार करण्यावरील आणि विक्री करण्यावरील बंदी उठवली आहे. या निर्णयामुळे मूर्तिकार आणि गणेशोत्सव मंडळांमध्ये समाधानाचं वातावरण निर्माण झाले आहे.

### शेतकऱ्यांनो,पेरणीची घाई करू नका

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर** : मागील दोन आठवड्यांपासून राज्यातील मान्सूनचा प्रवास थांबला आहे. ही स्थिती १४ जूनपर्यंत अशीच राहण्याची शक्यता आहे. .

### आ. क्षीरसागर यांच्या विरोधात गंभीर आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड** : जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्याविरोधात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर जोरदार आंदोलन छेडले आहे. आमदार क्षीरसागर यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांची विकासकामे हेतुपुरस्सरपणे रोखल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. सन २०१९ पासून आमदार क्षीरसागर कोट्यवधी रुपयांची टक्केवारी घेऊन कामांमध्ये अडथळा निर्माण करत असल्याचा थेट आरोपही स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला. ते केवळ तोडपाणी मिळवण्यासाठी कामे थांबवत आहे.

# अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील: शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

जनता आवाज वृत्तसेवा

**राहाता : तालुक्यातील बाभळेश्वर, राजुरी ममदापूर, तिसगाव वाडी, अस्तगावच्या काही भागांमध्ये चक्रीवादळ सदृश्य पावसाने डाळिंब, आंबा, ऊस व साठवलेला कांदा तसेच घरे, गोठा यांवर झाडे पडून मोठे प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत, शासन नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांसह नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**



राहाता तालुक्यातील या नुकसानग्रस्त भागाची पालकमंत्री विखे पाटील यांनी पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधत दिलासा दिला. त्यावेळी ते बोलत होते.

७ जून रोजी सायंकाळी बाभळेश्वर, राजुरी, ममदापूर, तिसगाव, अस्तगाव या भागामध्ये चक्री वादळाने फळबागा तसेच शेती पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भाऊसाहेब विनायक म्हस्के यांची कांदा चाळ, डाळिंब उत्पादक राहुल सुरेश कसाब आणि डाळींबरत्न बी. टी. गोरे यांच्या डाळींब बागा थेट शेतात जाऊन या नुकसानग्रस्त भागाची पाहणी पालकमंत्र्यांनी पाहणी केली.

वादळी वाऱ्यामुळे या भागातील वीज पुरवठा हा गेल्या दोन दिवसांपासून बंद आहे. वीज पुरवठा तातडीने सुरू करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी युध्द पातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले. नैसर्गिक आपती असली तरी, भविष्यात नुकसान कसे टाळता येऊ शकते, यावरच उपाय योजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. प्रत्येकाचा पंचनामा करून तातडीने अहवाल सादर करा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

पाहणी दरम्यान पालकमंत्र्यांनी डाळिंब उत्पादकांशीही संवाद साधला अनेक भागांमध्ये डाळिंब उत्पादकांनी नवनवीन तंत्रज्ञान वापरले आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेतकऱ्यांना उत्पादनही मोठ्या प्रमाणात मिळत आहे. राहुल कसाब यांची फळभाग पूर्णपणे भुईसपाट झाली आहे. या बागेची पुन्हा बांधणी करण्यासाठी काय उपाययोजना करता येईल, याविषयी डाळिंबरत्न डॉ. बी. टी. गोरे यांच्याशी यासंदर्भात चर्चा करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### 'या' प्रशासकीय अधिकाऱ्यांची होती हजेरी

उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, यांच्यासह वीज वितरण कंपनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### मंत्री विखेंची मुख्यमंत्री फडणीस यांच्याशी चर्चा

जिल्ह्यात मागील काही दिवसांत मोठ्या स्वरुपातील पावसाने झालेल्या नूकसानीचा विचार करता स्थायी आदेशाच्या पलीकडे जावून मदत करण्याचा विचार करावा लागणार आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली आहे. झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करावे, महावितरणाचा विज पुरवठा सुरळीत करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

### कांद्याचे पंचनामे करून अहवाल पाठवा : विखे पाटील

आंबा, कांदा उत्पादकांना देखील या वादळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. कांदा चाळीवर पडलेल्या झाडांमुळे भिजलेल्या कांद्याचे पंचनामे करून अहवाल त्वरित पाठवण्याची सूचनाही विखे पाटील यांनी केल्या आहेत.

# ठाण्यात ट्रेनमधून १३ प्रवासी पडले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : ठाण्यातील मुंब्रा रेल्वे स्थानकावर आज सकाळी काही प्रवासी ट्रेनमधून खाली पडले. त्यापैकी काही जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. हे प्रवासी ट्रेनच्या दरवाज्याला लटकलेले होते, जिथून ते खाली पडले. समोर आलेल्या माहितीनुसार ही घटना लोकल ट्रेनची आहे.

सकाळच्या वेळेत प्रचंड गर्दीमुळे हा अपघात झाला. मात्र, या घटनेत किती प्रवासी जखमी आहेत आणि किती जणांचा मृत्यू झाला? या बाबत प्रशासन अद्याप माहिती देऊ शकलेले नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या घटनेत १३ प्रवासी पडले, ९ प्रवासी जखमी तर ४ जणांचा मृत्यू झाला आहे. मात्र, याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ चौकशी करण्याच्या सूचना दिल्या असून अपघातात ज्या ४ जणांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटूंबीयांना मदत म्हणून आम्ही ५ लाख रुपये जाहीर आहेत. याशिवाय जखमींना ५० हजार, एक लाख किंवा दोन लाख रुपये दिले जातील. तसेच त्यांचा सर्व उपचार शासनाच्या माध्यमातून केला जाईल. याशिवाय ज्युपिटरला जे दोन रुग्ण गंभीर आहेत.

### घटना अतिशय दुर्दैवी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दिवा-मुंब्रा स्थानकादरम्यान लोकलमधून एकूण ८ प्रवासी खाली पडून झालेल्या दुर्घटनेत काही जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींना तातडीने शिवाजी हॉस्पिटल आणि ठाणे सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. स्थानिक प्रशासन समन्वय साधून आहे.

### रेल्वे प्रशासन लवकर ठोस पावले उचलेल : पवार

मध्य रेल्वेमार्गावर कसाऱ्याहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणाऱ्या उपनगरी रेल्वेगाडीतून पडून प्रवाशांचा झालेला मृत्यू दूर्दैवी, क्लेशदायक आहे. रेल्वे प्रवाशांच्या मृत्यूनं उपनगरी रेल्वेवरील गर्दी आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दाकडे अधिक गांभीर्यानं लक्ष देण्याची गरज अधोरेखीत झाली आहे.

### उपाययोजना करा : सुळे

पुष्पक एक्स्प्रेसमधून खाली पडल्यामुळे पाच प्रवाशांना प्राण गमावावे लागले. कसारा स्टेशनजवळ ही दुर्दैवी घटना घडली. यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरीकांना भावपूर्ण श्रद्धांजली. या गाडीत प्रचंड गर्दी असल्याने हे प्रवासी दरवाजात लटकून प्रवास करीत होते. अशा पद्धतीने प्रवास करणे धोकादायक आहे. नागरीकांना नम्र विनंती आहे की कृपया आपण धोकादायक पद्धतीने प्रवास करु नये. यासोबतच रेल्वे प्रशासनाने देखील गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि संभाव्य नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना करावी.

# क्रुझर-ट्रकचा अपघात

## दोन ठार तर ११ गंभीर जखमी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : पूण्याहून एमपीएल क्रिकेट सामना बघून गावी जळगावला परतांना नेवासा तालुक्यात संभाजीनगर-अहिल्यानगर हायवेवर उस्थळ दुमाला नजिक क्रुझर व ट्रकचा अपघात होवून क्रुझरमधील दोन जणांना मुत्यू झाला. तर ११ जण जखमी झाले आहेत.

प्रथमेश योगेश तेली (वय १५) व वृषभ बबन सोनवणे (वय १६, दोघे रा. बोदवड) अशी मयतांची नावे आहेत.

तालुक्यातील उस्थळ दुमाला शिवारात झालेल्या अपघातात क्रुझर (क्र. एमएच २० डीजे ४८३४) गाडी पाठीमागून ट्रकवर आदळली. या अपघतात क्रुझर गाडीमधील २ ठार तर इतर ११ जण जखमी झाले आहेत. अपघातातील प्रथमेश योगेश तेली याचा जागेवरच

पान ४

### जखमींची नावे

चिन्मय गजानन भोईर वय १०, कुश योगेश घाटे वय ११, प्रघुम्न अनिकेत कुलकर्णी १०, आरव विजय शेळके १२, प्रतिक विठोबा धुमक १५, हर्षल भगवान महाजन १४, आगम धरमचंद खिवसरा १४, वंश ओमप्रकाश अग्रवाल १२,रोहन अंकित बेगाने १२, साई गुलाब जाट १५, उदय मोहन कोल्हे १४.





# ...आता तत्काळ समस्या सोडविता येणार

## आ. संग्राम जगताप; सक्शन अँड जेटिंग वाहनांचे लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : दिवसेंदिवस शहराचा विस्तार होत आहे. लोकसंख्या वाढत आहे. त्याच प्रमाणात सेवा व सुविधांची मागणीही वाढत आहे. त्यासाठी महानगरपालिकेची सेवा व सुविधा पुरवणारी यंत्रणा बळकट असणे आवश्यक आहे. याच दृष्टिकोनातून राज्य शासनाकडे पाठपुरावा करून शहरातील ड्रेनेज लाईन, चेंबरची तत्काळ व अधिक प्रभावीपणे साफसफाई होण्यासाठी महानगरपालिकेला अत्याधुनिक वाहने उपलब्ध करून दिली आहे. या वाहनांमुळे नागरिकांच्या तक्रारीवर तत्काळ कृती होऊन त्यांच्या समस्याही तत्काळ सोडवता येतील, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.



आ. जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या सक्शन अँड जेटिंग वाहनांचे लोकार्पण आ. जगताप व आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते काल, सोमवारी महानगरपालिकेत पार पडले.

दोन वाहने उपलब्ध झाली असून, ७ टन क्षमतेच्या वाहनाचे लोकार्पण सफाई कामगारांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपायुक्त संतोष टेंगळे, विजयकुमार मुंडे व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

आ.जगताप म्हणाले की, महानगरपालिका आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या समस्या सोडवते. मात्र, अनेकवेळा साधन सामग्री अथवा अद्ययावत मशिनरी नसल्यामुळे

पान ४

# कार्यकर्त्यांनो, समाजहितासाठी काम करा

## विवेक कोल्हे; भाजपा नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा नागरी सत्कार





**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्ष आहे त्याचे अध्यक्ष म्हणून मतदारसंघात पक्ष वाढीसाठी कदम यांनी जोमाने काम करावे, असे प्रतिपादन युवानेते विवेक कोल्हे यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या कोपरगाव तालुकाध्यक्ष (पश्चिम मंडळ) पदावर सुनील कदम यांची निवड झाल्याबद्दल कोपरगाव आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या वतीने नागरी सत्कार समारंभ राघवेश्वर मंदिर, कुंभारी येथे उत्साहात पार पडला. सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष युवानेतृत्व विवेक कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सत्कार सोहळा अत्यंत प्रेरणादायी वातावरणात पार पडला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

यावेळी सुनील कदम यांचा सन्मान करण्यात आला आणि पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या सोहळ्याला नागरिकांचा व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते शरद थोरात, कोल्हे कारखाना व्हा. चेअरमन राजेंद्र कोळपे, बाजार समिती सभापती साहेबराव रोहोम, औद्योगिक

पान ४

> चांगले काम करणाऱ्याला न्याय देण्यात यावा, अशी भूमिका बिपीन कोल्हे आणि मा. आ. स्नेहलता कोल्हे यांच्यासह आम्हा सर्वांची आहे. पक्ष वाढीसाठी आपण पूर्ण ताकदीनिशी काम करतो आहोत. पक्षहितासाठी आपण गत निवडणुकीत भूमिका घेतली. पण दुर्दैवाने जे यश आपण लोकप्रतिनिधींच्या पदरात टाकले. त्याप्रमाणे अपेक्षित काम होताना दिसत नाही हे वास्तव आहे. यामुळे नागरिकांच्या समस्या आणि प्रश्न सोडवण्यासाठी पक्षाच्या माध्यमातून आपले काम सुरू आहे.
>
> **- विवेक कोल्हे, युवानेते**

### भाजप जगातील सर्वात मोठा पक्ष : ना. राधाकृष्ण विखे पाटील

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात वाढू लागली आहे. अलीकडेच माध्यमांशी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले होते की, ''जे जनतेच्या मनात आहे, तेच होईल. आता थेट बातमीच देऊ.'' त्यांच्या या वक्तव्यामुळे शिवसेना ठाकरे गट आणि मनसे युतीच्या शक्यतांना आणखी पंख फुटले आहेत. या घडामोडींवर आता राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठे विधान केले आहे.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना विविध मुद्यांवर भाष्य केले.

# 'शनि' देवस्थानचे विश्वस्त मंडळ बरखास्त करा

## देवस्थानावर कर्तव्यदक्ष सरकारी प्रशासकाची नेमणूक करावी : विशाल सुरपुरीया यांची मागणी



जनता आवाज वृत्तसेवा

**सोनई : शनिशिंगणापूरच्या देवस्थानच्या विश्वस्त मंडळाला बरखास्त करून सदर देवस्थानावर कर्तव्यदक्ष सरकारी प्रशासकाची नेमणूक करावी, अशी मागणी विशाल सुरपुरीया यांनी केली आहे. याबाबत भाजपच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन देण्यात आले आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, देवस्थानच्या नावाने खोटे व बोगस ॲपची निर्मिती करून त्याद्वारे सुमारे ४०० ते ५०० कोटी रुपयांची आर्थिक लूट व अपहार केलेला आहे. देवस्थानची व देवस्थानमधील सर्व कर्मचारी व सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची सखोल चौकशी होऊन सर्वांच्या संपत्तीची चौकशी करून संबंधित ॲप निर्मितीमध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तीविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करून संबंधितांना कठोर शासन करण्यात यावे व देवस्थानने भक्तगणांसाठी २ हजार रुपये ऑनलाईन आकारणी करून सदर रक्कम ऑनलाईन ट्रान्सफर मार्फत पुरवली जाण्याबाबतचे आहे.

ज्या मार्फत कोट्यावधीचा आर्थिक घोटाळा राजरोसपणे चालू आहे. लोकांची व भोळ्या भाबड्या शनि भक्तांची आर्थिक लूट करून अमाप बेहिशोबी संपत्ती मालमत्ता कमवायच्या उद्देशाने सदर देवस्थानातील संबंधित खात्याचे विभाग प्रमुख कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी वर्गाने सदरचे ॲप बोगस निर्माण करून त्याद्वारे शनि भक्तांकडून खूप मोठ्या प्रमाणात रक्कम

पान ४

### विश्वस्त मंडळाचा भूमिका संशयस्पद

शनि देवस्थानमधील देवस्थानने यामागे कधीही देवस्थाने दर्शन ॲप सर्विस बाबत जाहिरात केलेली नाही त्यामुळे कधीही ॲप ची जाहिरात केली नसताना बंद केलेल्या ॲपची ताबडतोप जाहीर करण्याचे आव्हान हीच विश्वस्त मंडळाचा भूमिका संशयस्पद आहे.

> शनि देवस्थानमधील घोटाळ्याची चौकशी सुरू राहील व संबंधित प्रकरणात गुन्हा दाखल होईपर्यंत आपण शैनेश्वर देवस्थानमधील कमिटी अधिकारी, सर्व विश्वस्त मंडळाला स्थगिती देऊन किंवा बरखास्त करून शासन नियुक्त कर्तव्यदक्ष अधिकारी शनेश्वर देवस्थान प्रशासक म्हणून नियुक्ती करावी व ॲप घोटाळ्यातील चौकशी पारदर्शक पद्धतीने करावी.
>
> **- विशाल सुरपूरीया**

### अधिकाऱ्यांसह विश्वस्तांनी केला घोटाळा

शनिदेवस्थानमधील विश्वस्त मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांची या संपूर्ण प्रकरणात चौकशी करून यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावे. चौकशी होताना ज्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी विश्वस्तांनी हा घोटाळा केला. तेच जर या शैनेश्वर देवस्थान विश्वस्त कमिटीवर चौकशी सुरू असताना बसलेले असतील तर घोटाळ्यातील अनेक पुरावे नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सर्व घोटाळ्याचे पुरावे शनेश्वर देवस्थान विश्वस्त कमिटी पुसून टाकून घोटाळा करणाऱ्यांना पाठीशी घातल्याशिवाय राहणार नाही.

# चार गावांमध्ये विकसित कृषी संकल्प अभियान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री श्री शिवराज सिंह चौहान यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या राष्ट्रीय 'विकसित कृषी संकल्प अभियान'ची तयारी पूर्ण झाली आहे. १५ दिवस चालणाऱ्या या व्यापक अभियानादरम्यान शेतकऱ्यांना व शास्त्रज्ञांना प्रोत्साहन दिले तसेच त्यांच्याशी थेट संवाद साधला.

संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील रोहिला निपाणी आणि जेऊर व वैजापूर तालुक्यातील बळ्हेगाव या चार गावांमध्ये विकसित कृषी संकल्प अभियान यशस्वीरित्या पूर्ण झाले.

यावेळी चंद्रशेखर, डॉ. काकासाहेब सुकाशे, डॉ. दिलीप हिंगोले, स्वप्निल वाघ, विष्णू गायकवाड गावकऱ्यांनी त्यांचे फुलगुच्छ देऊन स्वागत केले.

हिंगोले यांनी कपाशीची बोंड सड बद्दल माहिती सांगितली. चंद्रशेखर यांनी तुरी या पिकावरील वांझ पणा व त्यावरील उपाय सांगितले.

**खताचे योग्य नियोजन करा**

सुकाशे यांनी गुलाबी बोंड अळी नियंत्रण करण्यासाठी कमी कालावधीची वाण लावावे. बीज प्रक्रिया करावी. माती परीक्षण करून त्यानुसार खताचे नियोजन करावे. तुरीचा गोदावरी वाणाबद्दल माहिती दिली.

# कर्जत-जामखेडच्या विकासासाठी सदैव कटिबद्ध

## सभापती राम शिंदे; कर्जतच्या दिघी, कापरेवाडी, कोरेगाव, शेगूड गावात विविध विकासकामांचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत-जामखेड मतदार संघाच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे. मात्र राहून राहून मला ६२२ मतांच्या फरकाची आठवण होते, असे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे कर्जत तालुक्यातील दिघी येथे बोलताना म्हणाले.

कर्जत तालुक्यातील दिघी, कापरेवाडी, कोरेगाव, व शेगूड या गावातील सुमारे आठ कोटी रुपयांचा विविध विकास कामांचा शुभारंभ विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते झाला. ही सर्व कामे राम शिंदे यांच्या प्रयत्नांमधून मंजूर झाले आहेत.

यावेळी भाजपचे जेष्ठनेते कैलास शेवाळे, सभापती काकासाहेब तापकीर, माजी जि.प.सदस्य अशोक खेडकर, माजी जि.प.सदस्य प्रवीण घुले, माजी पंचायत समिती सदस्य प्रकाश शिंदे, मंडल अध्यक्ष अनिल गदादे, दादासाहेब सोनमाळी, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सुनील यादव, युवराज शेळके, चिंतामण शेळके, अजित शेळके, निळकंठ मुरकुटे, भीमराव शेळके, विजय पाचपुते, हरिभाऊ मुरकुटे, नंदलाल काळदाते आदी उपस्थित होत्या.



सभापती शिंदे म्हणाले की, मी विकास काम करताना कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही किंवा कोणत्या व्यक्तीने मागणी केली आहे याचाही कधी विचार केला नाही. आज दिघी गावामध्ये विकास कामांचा शुभारंभ होत आहे. यापूर्वी देखील या गावातील मंदिरांसाठी किंवा विकास कामांसाठी फक्त मीच निधी दिलेला आहे. मात्र काही जणांना निवडणुका जवळ आल्या की, मंदिरांची आठवण होते, असा टोला आ. रोहित पवार यांना राम शिंदे यांनी नाव न घेता लगावला.

राज्यातील महायुतीचे सरकार हे अतिशय गतिमान सरकार आहे. यामुळे येणाऱ्या कालावधीमध्ये देखील मतदार संघामध्ये सरकारकडून आपण मोठ्या प्रमाणामध्ये विकास निधी उपलब्ध करू. मतदार संघाच्या विकासासाठी यापुढील काळात देखील प्राधान्य राहणार आहे.

**– राम शिंदे, सभापती**

**प्रा. शिंदेंच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ**

कर्जत तालुक्यातील राज्यमार्ग चापडगाव ते जिल्हा हद्द असा ४/५०० ते ७/५०० या एक कोटी १६ लाख रुपये एवढा खर्च अपेक्षित असणाऱ्या या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ तसेच स्थानिक विकास निधी मधून महादेव मंदिर येथे दहा लाख रुपयांचा सभामंडप या दोन्ही विकास कामांचा शुभारंभ सभापती राम शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

# अनोळखी इसमाचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** बेशुद्ध अवस्थेत तारकपूर येथील साई एशियन हॉस्पिटल समोर मिळून आलेल्या ७० वर्षीय अनोळखी इसमास औषधोपचारा करता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता, त्यांचा उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. ही घटना ८ जून रोजी साडेबारा वाजता घडली. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कोल्हे यांनी दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलिसांनी बी एन एस एस १९४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद केली.

# १३ जिल्ह्यातील दिव्यांग शाळेंचा प्रश्न मार्गी : साळवे

## आ. सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** महाराष्ट्र शासन व प्रशासनाने १५ डिसेंबर २०२२ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग करणारे पहिले राज्य महाराष्ट्र आहे. राज्यातील १३ जिल्ह्यातील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय मोठा गाजावाजा करून १ मे २०२५ रोजी सुरू करण्यात आले.

परंतु, कुठल्याही स्वरूपाचे अधिकार प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आलेल्या १३ जिल्ह्यातील जिल्हा दिव्यांग सक्षमिकरण अधिकाऱ्यांना प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे तातडीने मंत्रालय व आयुक्त कार्यालाकडे पाठपुरावा करून डीडीओ कोड प्राप्त करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली, अशी माहिती संजय साळवे यांनी दिली.

दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, जीपीएफ,मेडिकल बीले,सेवानिवृत्त कर्मचारी व त्या अनुषंगाने सर्व कामे प्रलंबित होते ती सर्व मार्गी लागेल.त्याचबरोबर दिव्यांग बांधवांच्या योजना देखील कार्यान्वित होतील.

संघटनेने व नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आ. सत्यजित तांबे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे यांनी तातडीने दखल घेतली. त्यानुसार ४ जून २०२५ रोजी दिव्यांग कल्याण विभागाचे अवर सचिव भा. रा. गायकवाड यांनी तातडीने आदेश निर्गमित केले.

सदर आदेशामुळे १३ जिल्ह्यातील कर्मचारी व दिव्यांग बांधवामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. दिव्यांग शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने विशेष आभार मानले आहे.

# युवक राष्ट्रवादी बळकट करण्यासाठी प्रयत्नशील

## अब्दुल शेख; बेलपिंपळगाव गट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय व शाखेचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शाखेचे उद्घाटन तसेच राष्ट्रवादी सदस्य नोंदणी अभियान, महाराष्ट्र घरेलू कामगार महिला योजना नोंदणी यांचाही शुभारंभ करण्यात आले.




राष्ट्रवादी काँग्रेसचे नेवासा तालुकाध्यक्ष अशोक मोरे, गणेश चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी बेलपिंपळगाव शाखा स्थापन करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेब भांड होते.

शाखेचे अध्यक्ष म्हणून राजेंद्र धिरडे, उपाध्यक्ष दिलीप लंघे, सचिव रवींद्र गटकळ, सरचिटणीस अनिल पुंड,सदस्य बाबासाहेब भांड, विश्वनाथ कांगुणे, दत्तात्रय पुंड आदी सक्रिय कार्यकर्ते यांनी अजित पवार यांचे हाथ बळकट करण्यासाठी मोठ्या प्रमाणात युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

बेलपिंपळगावकर यांच्या वतीने अब्दुल शेख यांचे तोफेची सलामी देत स्वागत करण्यात आले. त्यांच्या सोबत मकरंद राजहंस, अशोक मोरे, संदीप लष्करे, धनू कणगरे, भारत चौगुले, राहुल कांगुणे, किशोर गारुळे, बंडूपंत चौगुले, दत्तात्रय राऊत, मुमताज शेख, कृष्णा शिंदे, अनिल पुंड, गणेश गारुळे, सुनील शिरसाठ, महेश आघाडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन गणेश चौगुले यांनी केले. कार्लस साठे यांनी मनोगत व्यक्त केले.

अजित पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने गाव तिथे राष्ट्रवादी उपक्रम राबवणार असून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या दृष्टीने सर्वसामान्य कार्यकर्त्यांना न्याय मिळुन देण्याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ताकदीने उभा राहिल.

**–अब्दुल शेख, युवानेते राष्ट्रवादी काँग्रेस**

# वट सावित्री पौर्णिमेच्या पूजेसाठी सुट्टी मिळावी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शिक्षकांचे तालुका निहाय प्रशिक्षण वर्ग सावेडी आनंदनगर विद्यालय येथे सुरू आहे.या प्रशिक्षण वर्गात महिला शिक्षकांचा बहुसंख्येने सहभाग आहे.हा प्रशिक्षण वर्ग १२ जून २०२५ पर्यंत सुरू आहे.

परंतु महिलांचा वटपौर्णिमा उत्सव १० जून २०२५ रोजी असल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील महिला शिक्षकांना वडाची पूजा करण्यासाठी सवलत देण्यात यावी. मुहूर्त वेळ १२.४५ पासून पुढे आहे.तरी विश्व हिंदू परिषदेकडून आवाहन करण्यात येते की, अर्धा दिवस महिला शिक्षकांना सवलत मिळावी. याबाबत विश्व हिंदू परिषदेत जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर यांनी निवेदन दिले आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त प्लास्टिक मुक्तीचा संकल्प

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** वृक्ष हे आपल्याला फळे, फुले आणि सावली देतात, म्हणून केवळ वृक्ष लागवड करणे महत्त्वाचे नसून त्यांचे जतन आणि संवर्धन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रल्हाद घुले यांनी केले.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून वसंतराव नाईक वाचन मंदिराच्या वतीने पाथर्डी शहरातील आनंदनगर येथील श्री जगदंबा देवी, संत सेवादास महाराज मंदिराच्या प्रांगणात ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना घुले बोलत होते.



पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी प्लास्टिकमुक्तीची संकल्पना प्रभावीपणे मांडली. प्लास्टिकच्या वापरामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. आपण सर्वांनी प्लास्टिक न वापरण्याची शपथ घेऊन पर्यावरण संरक्षणासाठी पाऊल उचलले पाहिजे.

**– नामदेव कीर्तने**

यावेळी ज्येष्ठ नागरिक नामदेव कीर्तने, कवी एकनाथ चेन्ने, दत्तूशेठ चव्हाण, वसंतराव नाईक वाचन मंदिराचे अध्यक्ष व माजी पंचायत समिती सदस्य विष्णुपंत पवार, सुरेशशेठ चव्हाण, सारंगधर जाधव हे उपस्थित होते.ज्येष्ठ नागरिकांनी पर्यावरण संवर्धनासाठी घेतलेला पुढाकार आणि त्यांचा उत्साह यामुळे पाथर्डी शहरात जागतिक पर्यावरण दिन साजरा होताना एक नवा आदर्श निर्माण झाला. प्रास्ताविक, सूत्रसंचालन सचिन चव्हाण यांनी केले. तर आभार विलास पवार यांनी मानले.

# चणेगावात कृषीदूतांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथे श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालदाड येथील कृषिदूतांचे आगमन झाले आहे. पुढील तीन महिन्यांसाठी ते गावात वास्तव्यास राहून शेतकऱ्यांना विविध कृषी विषयक मार्गदर्शन करणार आहेत.

या कृषिदूतांचे चनेगाव येथे ग्रामपंचायत व शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. या गटाचे मार्गदर्शक कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरविंद हारदे असून या गटांमध्ये कृषिदूत विवेक रौंदळ, आदित्य राऊत, ढोले अभिषेक, ढोमसे रोशन, ओम शेजुळ हे विद्यार्थी आहेत. हे कृषिदूत शेतकऱ्यांना नव्या तंत्र माहिती, सुधारित शेती पद्धती, पिकाचे नियोजन, खत व्यवस्थापन, जैविक शेती, सिंचन पद्धती आणि विविध सरकारी योजनेचा लाभमिळवून देण्याचे कार्य करण्यात येणार आहे. या कृषिदूतांचे शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी गावचे सरपंच भाग्यश्री खेमणार, तलाठी गांगुर्डे, लिपिक गणेश पाटोळे आणि शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमामुळे गावातील शेतीत नक्कीच सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# ...पुन्हा पिंजरा लावण्याची शेतकऱ्यांची मागणी

## उंबरीबाळापुर येथे एक बिबट्या जेरबंद; अद्यापही ३ ते ४ बिबट्याचे वास्तव्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथील मेढपाळ संदीप खंडू होडगर यांच्या मेंढ्याच्या गोठ्यावर तसेच कोंबडीच्या पोल्ट्री फॉर्मवर हल्ला करणारा एक बिबट्या अखेर पिंजऱ्यात पकडण्यात वन विभागाला यश आले असुन अद्यापही ३ ते ४ बिबटे होडगर वस्तीवर फिरकत असल्याचे शेतकरी संदीप होडगर यांनी सांगितले.

सविस्तर माहिती अशी की, शेतकरी संदीप खंडू होडगर यांनी गाय, शेळ्याप्रमाणे जवळपास ३५ मेंढ्या बॅंकेचे कर्ज काढून विकत घेतल्या. शेड तसेच जवळच असलेल्या पोल्टी फॉर्ममध्ये काही मेंढ्या होत्या. तसेच १०० हून अधिक कोंबडया होत्या. बिबट्याच्या हल्ल्यात २ कोकरे मृत झाले होते. तसेच ५ कोकरे हे जबर जखमी तर १७ मेंढ्या किरकोळ जखमी झाल्या होत्या. तसेच जवळपास ३० ते ३५ कोंबड्या ही बिबट्याच्या हल्ल्यात मृत झाल्या. त्यामुळे लवकरात लवकर लावून इतरही ठिकाणी पिंजरे लावावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# बांधकाम कामगारांच्या लाभांचे अर्ज मंजूर करा

## जनशक्ती श्रमिक संघाची सहाय्यक कामगार आयुक्तांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** गेल्या आठ ते नऊ महिन्यापासून शेकडो नविन बांधकाम कामगारांनी भरलेले अर्ज तथा नुतणीकरणाचे पेडींग अर्ज कित्येक दिवसापासून प्रलंबित असून सदरचे अर्ज लवकरात लवकर मंजूर करावेत यासह नवीन अर्ज मंजूर झालेल्या बांधकाम कामगारांना ओळखपत्र देवून त्यांना सुरक्षा संच व गृहपयोगी साहित्य संचाचे वाटप करावे.



सन २०२४-२५ या वर्षाचे लाभाचे व शिष्यवृत्तीचे पेडींग अर्ज मंजूर करावेत अशा आशयाचे निवेदन जनशक्ती श्रमिक संघाच्या वतीने सहाय्यक कामगार आयुक्त प्रकाश भोसले यांना अहिल्यानगर येथे दिले.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या कार्यकाळात बांधकाम कामगारांनी मोठ्या प्रमाणात नविन व नुतणीकरनाचे अर्ज ऑनलाइन केले होते. आठ ते नऊ महिन्यापासून या बांधकाम कामगारांचे अर्ज प्रलंबित आहेत. त्यामुळे हे अर्ज तातडीने मंजूर करावेत.

जेणेकरून या कामगांना शासनाच्या बांधकाम कामगार मंडळाच्या इतर योजनेचा देखील लाभ घेता येईल. जे अर्ज मंजूर आहेत परंतु त्यांना ओळखपत्र मिळालेले नाहीत अशांना लवकरात लवकर ओळखपत्र देण्याची व्यवस्था आपल्या कार्यालयाकडून करण्यात यावी.

सन २०२४-२५ या वर्षामध्ये नोंदीत बांधकाम कामगारांनी त्यांच्या पाल्याच्या शिष्यवृत्तीचे अर्ज मोठ्या संख्येने ऑनलाईन केले. त्यांचे अर्ज देखील प्रलंबित आहेत हे सर्व अर्ज तातडीने मंजूर करून नोंदणीकृत बांधकाम कामगारांना न्याय घ्यावा. नोंदीत बांधकाम कामगारांना अ.नगर येथे सुरक्षा किट व गृहपयोगी साहित्य घेवून जाण्यासाठी बोलावले जाते. याठिकाणी सुद्धा मोठ्या प्रमाणात बांधकाम कामगारांची हेळसांड होते. दिवसभर काम सोडून येथे रांगेत उभा राहून सुद्धा साहित्य मिळेल याची शाश्वती नसते. सुरक्षा किट व गृहपयोगी साहित्य वाटपासाठी शेवगाव तालुक्यात कॅम्पचे आयोजन करावे. या कामगारांच्या हिताच्या मागण्या संदर्भात सकारात्मक विचार करून तातडीने सर्व मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

... अन्यथा आंदोलन करणार

दिलेल्या मागण्यासंदर्भात आठ ते दहा दिवसात जर कार्यवाही झाली नाही. तर दि. १७ जून २०२५ रोजी कोणत्याही प्रकारचे निवेदन न देता आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जनशक्तीचे कार्याध्यक्ष राम पोटफोडे, संघटनेचे अध्यक्ष संजय दुधाडे, श्रमिक संघाचे उपाध्यक्ष भारत लांडे आदींनी दिला आहे.

# दत्तात्रय नांगरे यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील भोपळेगल्लीतील रहिवासी दत्तात्रय दगडू नांगरे (वय ६५) यांचे ९ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मिरी गटात राजकीय गणित बदलणार?

## पंचायत समिती सदस्य राहुल गवळींचा शिंदे शिवसेनेत प्रवेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकां पूर्वीच पाथर्डी तालुक्यातील मिरी पंचायत समिती गणाचे सदस्य आणि मिरी, करंजी जिल्हा परिषद गटातील राजकीय युवा नेतृत्व तसेच माजी आ. प्राजक्त तनपुरे यांचे समर्थक राहुल गवळी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने मिरी गटातील राजकीय गणित ढवळून निघाली आहेत.

राहुल गवळी पक्षांतर करणार याची काही दिवसांपूर्वी अप्रत्यक्षपणे गटात तालुक्यात चर्चा होती या चर्चेला गवळी यांनी शिंदे सेनेचे राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई यांच्यासह, आ. अमोल खताळ, आ. विठ्ठलराव लंघे, जिल्हाध्यक्ष अनिल शिंदे, शहराध्यक्ष सचिन जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये एका कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवधनुष्य हाती घेत पूर्णविरामदेत महायुती सोबत जाण्याचा निर्णय घेतला.



राहुल गवळी यांच्याबरोबरच मिरी गावचे सरपंच जालिंदर गवळी, सेवा संस्थेचे चेअरमन आसाराम भगत, ठाकरे सेनेचे एकनाथ झाडे, जालिंदर शिंदे, अशोकराव गवळी, अशोक घोंगडे यांच्यासह मिरी गावातील अनेक दिग्गज नेतेमंडळीने शिंदे सेनेत प्रवेश केल्याने मिरी गावा शरद पवार राष्ट्रवादी पक्षाबरोबरच महाविकास आघाडीची मात्र मोठी अडचण निर्माण झाली आहे.

मागील पंधरा वर्ष मिरी करंजी जिल्हा परिषद गटातून शिव धनुष्यावर स्वर्गीय मोहनराव पालवे, अनिलराव कराळे यांनी निवडणुका लढवल्या आणि जिंकल्या देखील. त्यामुळे गटातील सर्वसामान्य जनतेला मतदारांना शिवधनुष्याबाबत असणारी राजकीय अस्था आणि आपुलकी पाहता शिव धनुष्य हाती घेऊन पुढे जाणाऱ्या राजकीय नेते मंडळीचे भविष्य उज्वल ठरणारे राहिले आहे. त्यामुळे राहुल गवळी यांनी देखील शिवधनुष्य हाती घेत महायुतीमध्ये प्रवेश करत एक नवीन राजकीय दिशा आणि भूमिका घेण्याचा घेतलेला निर्णय भविष्याच्या राजकीय दृष्टिकोनातून महत्वपूर्ण ठरणारा आहे.

**गवळी यांच्या निर्णयामुळे राजकीय धक्का**

गवळी यांच्या शिंदे सेनेच्या प्रवेशामुळे मिरी गटातच नव्हे तर तालुक्यातून अनेकांच्या राजकीय भुवया उंचावल्या आहेत. गवळी यांच्या शिंदे सेनेतील प्रवेशामुळे महायुतीची मिरी गटात ताकद आणखी वाढणार असून महाविकास आघाडीला मात्र गवळी यांच्या निर्णयामुळे जिल्हा परिषद निवडणुकी आधीच मोठा धक्का बसला आहे.

आवाज जागरूक जनतेचा
जनता आवाज
अहिल्यानगर, मंगळवार, दि. १० जून २०२५

# शिंगणापुरात विविध संघटनांचे धरणे आंदोलन

## बनावट ॲप घोटाळ्यातील कारवाई करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** शनिशिंगणापूर मधील बनावट ॲप घोटाळ्याची तातडीने चौकशी व्हावी व तातडीने कारवाई व्हावी, यासाठी काँग्रेस व विविध संघटणाकडून शिंगणापूर देवस्थान आवारात धरणे आंदोलन करण्यात आले.

शनीशिंगणापूरमध्ये काही कर्मचाऱ्यांनी, पुजाऱ्यांनी देवस्थानच्या अधिकृत ॲपच्या ऐवजी बनावट ॲप तयार करून ऑनलाईन पूजेच्या माध्यमातून तसेच बनावट देणगी पावती व बनावट च्या माध्यमातून करोडो रुपयाचा घोटाळा करून हा निधी आपल्या खाजगी खात्यावर वळून घेतला. यात देवस्थानची व देशभरातील शनिभक्तांची मोठी लूट या घोटाळा बहाद्दरांनी करून दाखवली.

यावेळी काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक व धर्मदाय उपायुक्त यांची भेट घेऊन चौकशीची मागणी देखील केली. तर देवस्थान प्रशासनाकडे त्यांनी परवानगी दिलेल्या ॲपबद्दल माहिती मागण्यात आली होती. यामध्ये धर्मदाय आयुक्त यांचे परवानगी पत्र, ट्रस्टचा ठराव, करारनामा अशी माहिती मागण्यात आली होती. देवस्थान प्रशासनाने हि माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने व घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घातल्याने इतर ॲपची माहिती दाबण्याचा प्रयत्न केल्याने आज देवस्थान आवारात काँग्रेस व विविध संघटनाकडून देवस्थान आवारात भर उन्हामध्ये धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी या घोटाळ्याचा तीव्र गतीने तपास करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी देवस्थान प्रशासनाने फक्त तीन ॲपवर कारवाईची मागणी करून इतर ॲपवाल्यांना व बनावट पावती पुस्तकं घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घालणे ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. पूर्ण कारवाई होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही असे स्पष्ट केले. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल,महिला अध्यक्ष शोभा पातारे, स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे, बहुजन वंचितचे विजयसिहं गायकवाड, संजय वाघमारे यांनी देखील याविरोधात मनोगत व्यक्त केले. तर आंदोलनात संजय होडगर, कानिफ जगताप, सुमित पटारे, संदीप मोटे, सतीश तऱ्हाळ, गोरक्षनाथ काळे, आदीसह शनिभक्त सहभागी झाले होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांना निवेदन दिले यात पुढील आठ दिवसात योग्य तपास न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

### घोटाळ्यात अधिकाऱ्यांचा संबंध

शेतकरी संघटनेचे अशोकराव काळे यांनी या घोटाळ्यात देवस्थानचे कर्मचारी, पुजारी, अधिकारी सहभागी असल्याचा आरोप करत भाविकांच्या श्रद्धेला यांनी गंडा घातल्याचा आरोप केला. हरीश चक्रनारायण यांनी देवस्थान आता सरकार जमा करण्याची वेळ आली असून प्रशासकाची याठिकाणी गरज आहे. त्याशिवाय भ्रष्टाचार दूर होऊन कारभार सुरळीत होणार नाही.




# 'डिके'च्या खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** महाराष्ट्र रायफल असोसिएशन मुंबई येथे दि. ५ ते ९ जून दरम्यान आयोजित कॅप्टन राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेमधून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्रवरा परिसरातून खेळाडूंचे कौतुक करण्यात येत आहे.

निवड झालेल्या खेळाडूंमध्ये साईशा शंकर विखे ४०० पैकी ३८३ म्हणजे ९५.७५ टक्के मिळविले असून अपेक्षा सुनील हसणाले ९६.२५ टक्के, यश राजेंद्र पवार ९४.५०, ईशान निखिल खर्डे ८७.५० टक्के, प्रसाद गाढे ८५.५०, आर्यन सचिन पठारे ८३, पुष्कर रमेश आहेर ८७.५०, ओम शिंदे ८०.७५ टक्के या विद्यार्थ्यांनी घवघवीतगुण यश संपादक केले आहे.

सर्व खेळाडूंचे सब युथ वयोगटातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल क्लबचे प्रशिक्षण प्रा. किरण रणपिसे, प्रा. सुशांत शेळके व प्रशिक्षक क्रीडा, शारीरिक शिक्षण संचालक दीपक रणपिसे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.




# वीर जवान गायकरांच्या परिवाराला दिला निधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** जगद्गुरु श्री संत तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी (३७५ वर्ष) सदेह वैकुंठ गमन सोहळा समिती ओतूर व वारकरी संप्रदायाच्या वतीने वीर जवान संदीप गायकर यांच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयाचा कृतज्ञता निधी सुपूर्द करण्यात आला.

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी (३७५) सदेह वैकुंठ गमन सोहळा समिती श्रीक्षेत्र ओतुर येथे पार पडला. कीर्तनात श्री गुरु बंडातात्या कराडकर यांनी आपण देशभक्तांचे कृतज्ञता म्हणून काही देणे लागतो म्हणून सप्ताह पार पडल्यावर निधी शिल्लक राहिल्यास देशाच्या सैन्यासाठी आपण निधी समर्पित करावा असे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत सप्ताहाचे मुख्य मार्गदर्शक ज्ञानेश्वर महाराज कदम छोटे माऊली यांनी मान्य केले. निधी सरकारला देण्याऐवजी सप्ताहाच्या कार्यक्षेत्रातच दहशतवाद्यांसोबत लढताना वीरगतीला प्राप्त झालेल्या वीरजवानाच्या परिवाराला द्यावे, असे ठरले.

यावेळी संगीत अलंकार इंद्रभान कोल्हाळ, संकेत महाराज आरोटे, नितीन महाराज देशमुख, संदीप महाराज थोरात, भीम राव महाराज हांडे यांनी संगीत प्रवचनातून देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून वीर जवान संदीप गायकर यांना श्रद्धांजली समर्पित केली.



### यांच्या हस्ते केला निधी सुपूर्द

जुन्नर तालुक्याचे आमदार शरद सोनवणे, गंगाराम महाराज डुंबरे, दीपक महाराज देशमुख, राजेंद्र महाराज सदगीर, विनायक तांबे, बाळासाहेब गायकर यांचे उपस्थितीत वीरमाता सरुबाई गायकर, वीरपिता पांडुरंग गायकर व वीरपत्नी दिपाली गायकर यांचेकडे हा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

# डॉ. तांबे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** मुळा एज्युकेशनच्या कृषि महाविद्यालय, सोनईचे विद्यार्थी कल्याण तथा क्रीडा अधिकारी डॉ. संदिप कडूभाऊ तांबे यांना गरुड फाउंडेशन, महाराष्ट्र राज्याचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी याठिकाणी देण्यात आली.

माजी राज्यमंत्री प्राजक्तदादा तनपुरे, गडचिरोली जिल्ह्याचे सहाय्य्क पोलीस आयुक्त संदिप भांड यांच्या हस्ते आणि शिवसेनेचे रावसाहेब खेवरे, गरुड फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आकाश पुजारी, कार्याध्यक्ष रमेश खेमनर यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक देण्यात आला. डॉ.संदिप तांबे केलेल्या शैक्षणिक कामाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.



राष्ट्रीय सेवा योजना तसेच क्रीडा विभागाच्या माध्यमातून त्यांनी महाविद्यालयातून अनेक विद्यार्थी घडवले असून, ते आज उच्च पदावर राज्यभरात विविध ठिकाणी काम करीत आहे.

या पुरस्काराबद्दल मुळा एज्युकेशनचे संस्थापक, ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख, मार्गदर्शक माजी.मंत्री शंकरराव गडाख, मुळा संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख, नेवासाच्या माजी सभापती सुनिताताई गडाख, सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरी मोरे आदींनी अभिनंदन केले.

# बारस्कर फर्निचर मॉल ग्राहकांची पसंदी

## आमदार जगताप; कॉटेज कॉर्नर येथील मॉलचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहर विकास कामातून बदलत असल्यामुळे नागरी वसाहती झपाट्याने वाढत आहे, लोकसंख्या वाढल्यामुळे त्यांच्या गरजा देखील वाढल्या आहेत. आता नगर शहरात ब्रँडेड वस्तूची दालने सुरू झाली आहे. बारस्कर फर्निचर हा व्यवसाय ३० वर्षापूर्वीचा असून बारस्कर कुटुंबीयांनी बदलत्या काळानुसार बदलत जात जिल्ह्यातील फर्निचरचे बारस्कर फर्निचर मॉल हे सर्वात मोठे दालन सुरू केले आहे, बारस्कर फर्निचर मॉलने ग्राहकांचा विश्वास संपादित केला.

या ठिकाणी फर्निचरच्या सर्वच वस्तू एका छताखाली मिळणार आहे, तरी ग्राहकांनी एकदा अवश्य या दालनाला भेट द्यावी, असे आवाहन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

मनमाड रोड कॉटेज कॉर्नर येथील बारस्कर फर्निचर मॉलचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी संचालक नितीन बारस्कर, सचिन बारस्कर, संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, माजी सभागृह नेते रवींद्र बारस्कर, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, बाळासाहेब पवार आदी उपस्थित होते.



युवकांनी आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर राजकारण समाजकारण न करता नोकरी , व्यवसाय याकडे लक्ष द्यावे आपले कुटुंब सक्षम असेल तर आपण सक्षम होऊ शकतो त्यानंतरच समस्येवेकडे वळावे असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी व्यक्त केले.

# गौतम पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्यूकेशन सोसायटीच्या कोळपेवाडी येथील गौतम पॉलिटेक्निक इंस्टीट्युटच्या तृतीय वर्ष मेकॅनिकल विभागातील ३० विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली असल्याची माहिती गौतम पॉलिटेकनिक इंस्टीट्युटचे प्राचार्य प्रा. सुभाष भारती व प्लेसमेंट अधिकारी प्रा.कैलास भोसले यांनी दिली आहे. यामध्ये बजाज ऑटो लिमिटेड या कंपनीत ०३, टाटा मोटर्स १०, भारत गेअर ०८, अभिराज मॅन पावर ०१ व कायनेटिक इंजीनीरिंग मध्ये ०८ अशा एकूण ३० विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच नोकऱ्या मिळाल्यामुळे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

दरवर्षी महाविद्यालयातील तृतीय वर्षातील सर्वच विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच नामांकित कंपन्या नोकरीत सामावून घेत आहे. महाविद्यालयाचा निसर्गरम्य परिसर, विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी परिश्रम घेणारे प्राचार्य, सहकारी प्राध्यापक, सर्व सोयीयुक्त वर्कशॉप विभाग, प्रयोगशाळा विभाग अशा सर्व सुविधांमुळे महाविद्यालयाचा नावलौकिक वाढत आहे.

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कर्मवीर शंकरराव काळे एज्यूकेशन सोसायटीचे चेअरमन माजी आ. अशोकराव काळे, विश्वस्त आ. आशुतोष काळे व्हा.चेअरमन छबुराव आव्हाड, मानद सचिव चैतालीताई काळे आदींनी अभिनंदन केले आहे.

# टाकळी फाटा येथे दुकानात चोरी

## ६२ हजार रुपयांची रोकड लंपास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील फुंदे टाकळी फाटा येथे अज्ञात चोरट्यांनी दोन दुकानांच्या मागील पत्रे उचकटून ६२ हजार रुपयांची रोख रक्कम चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दत्तात्रय अदिनाथ फुंदे (वय २६, रा. भुतेटाकळी, ता. पाथर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे 'गुरुदेव कॉम्प्युटर' आणि शेजारील महेश शंकर खेडकर यांचे 'बालाजी कृषी सेवा केंद्र' या दुकानांमध्ये ही चोरी घडली. फिर्यादीत म्हटले आहे की, दि. ८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता दुकाने बंद करून घरी गेल्यानंतर, ९ जून रोजी सकाळी ७ वाजता दुकाने उघडण्यासाठी गेल्यावर त्यांना मागील पत्रे उचकटलेले आढळले. दत्तात्रय फुंदे यांच्या दुकानातील काउंटरमधून २५ हजार रुपये आणि महेश खेडकर यांच्या दुकानातील काउंटरमधून ३७ हजार रुपये रोख रक्कम चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, स्थानिक व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पाथर्डी पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली आहे. अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू केला आहे. यापूर्वी याच ठिकाणाच्या परिसरात चोरीची घटना नुकतीच घडली आहे.

# कोल्हारमध्ये 'स्मार्ट गर्ल' कार्यशाळा उत्साहात

## भारतीय जैन संघटनेचे लाभले मोठे सहकार्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** भारतीय जैन संघटनेच्या विविध समाज उपयोगी उपक्रमापैकी एक अत्यंत संवेदनशील उपक्रम 'स्मार्ट गर्ल' वर्कशॉप कोल्हार येथील बेलापूर रोड स्थित जैन स्थानकामध्ये शनिवार व रविवार दिनांक ७ व ८ जून रोजी असे २ दिवस आयोजित करण्यात आला.

यामध्ये किशोर वयातील मुलींसाठी स्वजाणीव, संवाद आणि नातेसंबंध, मासिक पाळी देखभाल, आरोग्य व पोषण, आत्मसन्मान व स्वसंरक्षण, निवड आणि निर्णय, मैत्री आणि मोह, पालकांशी संवाद अशा वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली. तसेच भारतीय जैन संघटनेने बनवलेल्या स्मार्ट गर्ल कार्यशाळे द्वारे मुलींना प्रशिक्षित केले गेले.



या कार्यक्रमांमध्ये जैन समाजातील मुलींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मुलींचे विचार ऐकण्यासाठी भारतीय जैन संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य मनसुख चोरडिया, सुरेश बाठीया, महेंद्र कुंकूलोळ, सुधीर चोरडिया, विभागीय सचिव आशिष राका जैन संघटना कोल्हार शहराध्यक्ष अभिनव कुंकूलोळ, उपाध्यक्ष ॲड. भूषण राका, योगेश मुथा, दिनेश लोढा, अलोक भटेवरा यासह अनेक कार्यकर्ते व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रशिक्षण देण्यासाठी नाशिक येथील सुषमा गांधी ह्या बीजेएस हेड ऑफिसच्या वतीने उपस्थित होत्या.

### यांनीही केले मुलींना मार्गदर्शन

पर्यावरण सप्ताह निमित्ताने आपल्या छोट्या छोट्या घरगुती बदलातून आपण पाणी, वीज व कचऱ्याचे व्यवस्थापन कशा पद्धतीने करावे यासंबंधीचे मार्गदर्शन सोनाली चोरडिया यांनी केले. तसेच ग्लोबल वॉर्मिंगमुळे देशात वाढत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी सोलर प्रोजेक्ट प्रत्येकाने आपापल्या घरी व व्यवसायात बसवावेत अशी माहिती येथील उद्योजक सतीश खर्डे यांनी दिली. त्यांच्या आव्हानाला उपस्थिततांनी मोठा प्रतिसाद दिला. जैन संघटनेचे विभागीय अध्यक्ष श्री संजय शिंगवी यांनी या कार्यशाळेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# महानगर बँकेच्या अध्यक्षपदी गितांजली शेळके

## उपाध्यक्षपदी भास्करराव कवाद यांची निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** जी. एस. महानगर शेडयुल्ड बँकेच्या अध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे सॉलिसिटर गुलाबराव शेळके संस्थापक पॅनलच्या प्रमुख गितांजली उदयराव शेळके यांची तर उपाध्यक्ष पदी भास्करराव बाबासाहेब कवाद यांची संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली.

जी. एस. महानगर बँकेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक गितांजली उदयराव शेळके यांच्या नेतृत्वाखालील सॉलिसिटर गुलाबराव शेळके संस्थापक पॅनल तर विरोधी बँकेच्या माजी अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या नेतृत्वाखालील सॉलिसिटर गुलाबराव शेळके व सुमनताई गुलाबराव शेळके पॅनल मध्ये दुरंगी लढत होवून गितांजली शेळके यांच्या पॅनल ने शेकडा ८० टक्के मताधिक्य घेत संचालक मंडळाच्या १९ जागांपैकी १८ जागा दणदणीत मताधिक्य घेत व १ जागा बिनविरोध सर्वच्या सर्व १९ जागांवर कब्जा घेत बँकेची सत्ता एकहाती ताब्यात घेत विजय संपादन केला.

बँकेच्या निवडणूक निकालात गितांजली शेळके यांना स्पष्ट बहुमत मिळवल्या दिवशीच त्या बँकेत आल्या व कामकाजाला प्रारंभ केला. बँकेच्या इतिहासात आज अखेर एखादी, दुसरी निवडणूक झाली किंबवूना संस्थापक अध्यक्ष दिवंगत सॉलिसिटर गुलाबराव शेळके व दिवंगत ॲड. उदयराव शेळके यांच्या कार्यकाळात निवडणूका बिनविरोध पणे पार पाडल्या. सभासदांना निवडणूक झालेली कळत नव्हती. पण यावेळेची निवडणूक मात्र सासू सुमनताई शेळके विरुद्ध सूनबाई गितांजली शेळके यांच्यातील आरोप - प्रत्यारोपांनी ही निवडणूक गाजली. पण अखेर गितांजली शेळके यांची पुर्णपणे बहुमताने सरशी झाली व बँकेवर एकहाती वर्चस्व प्रस्थापित केले. काल झालेल्या बँकेच्या अध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे गितांजली शेळके यांची तर उपाध्यक्षपदी दुसऱ्यांदा भास्करराव कवाद यांची निवड करण्यात आली. या संचालक मंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुंबई चे निबंधक नितीन काळे हे होते तर नवनिर्वाचीत संचालक सचिन अडसूळ, रविंद्र ढोले, गणेश गुंजाळ, सतीश खणकर, कुंदा खोसे, छाया वाढवणे, मंगेश खोसे, श्रीधर कोठावळे, बबनराव लंके, संतोष पठारे, पांडुरंग शिंदे, शंकर शिंदे, मंगलदास थोरात, भिवाजी थोरात, विलास पालवे, संतोष रणदिवे उपस्थित होते.

तर गितांजली शेळके या सर्वसाधारण जागा व महिला राखीव या दोन जागांवर निवड झाल्याने त्यांना एका जागेचा राजीनामा द्यावा, लागणार असल्याने अनेक जण या एका जागेसाठी तर स्विकृत संचालक पदांसाठी देव पाण्यात ठेवून वाट पाहत आहे.

जी. एस. महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांना महानगर बँक परिवारात दैवत मानले जाते . त्यांच्या जयंती दिनी च बँकेच्या अध्यक्ष पदावर त्यांच्याच सूनबाई गितांजली उदयराव शेळके यांची निवड झाल्याने या निवडीला म हानगर बँक परिवारात कमालीचे महत्व प्राप्त झाले आहे .





# संपादकीय

## सीमेवर दुर्गाशक्ती...

१९९२ मध्ये महिलांच्या पहिल्या तुकडीची शॉर्ट सर्व्हिस कमिशनसाठी पाच वर्षांसाठी भरती करण्यात आली. त्यानंतर या सेवेचा कालावधी दहा वर्षांपर्यंत वाढवण्यात आला. २००६ मध्ये शॉर्ट सर्व्हिस कमिशन चौदा वर्षे करण्यात आले. भारतीय सैन्य आता महिलांना सशस्त्र दलात नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करून प्रोत्साहन देते. यासाठी आर्मी मेडिकल कॉर्प्स, आर्मी डेंटल कॉर्प्स आणि मिलिटरी नर्सिंग सर्व्हिसेसमध्ये महिलांसाठी कायमस्वरूपी कमिशन मंजूर करण्यात आले आहे. आता महिला अधिकाऱ्यांना ११ शस्त्रास्त्रे आणि सेवांमध्ये कायमस्वरूपी कमिशन मिळते. कायमस्वरूपी कमिशननंतर महिला अधिकाऱ्यांना भारतीय सैन्याच्या सर्वात महत्त्वाच्या भागांपैकी एक असलेल्या तोफखान्याचा भाग बनण्यास सुरुवात झाली आहे. सध्या, भारतीय सशस्त्र दलांमध्ये नियुक्त्यांमध्ये लिंगाच्या आधारावर कोणताही भेदभाव नाही. शस्त्रे आणि सेवांसाठी पुरुष आणि महिला सैनिकांच्या तैनातीत कोणताही फरक नाही. सर्वांना सैन्याच्या गरजेनुसार तैनात केले जाते. या कणखर निर्णयाची परिणती आता देशाला, जगाला बघायला मिळत आहे. भारतीय सैन्यात महिला अधिकाऱ्यांना कायमस्वरूपी कमिशन देण्यासाठी २३ नोव्हेंबर २०२१ रोजी लिंग तटस्थ करिअर प्रगती धोरण सुरू करण्यात आले. याद्वारे महिलांना शस्त्रास्त्रे आणि इतर सेवांमध्ये समान संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अर्थात हे सहजासहजी घडलेले नाही. महिलांना संधी दिल्याचे आता श्रेय घेत असलेल्या नेत्यांच्या सरकारच्या काळातच महिलांना कायमस्वरुपी कमिशनसाठी सर्वोच्च न्यायालयात लढा द्यावा लागला. 'एनडीए'मधील महिला अधिकाऱ्यांची एक तुकडी दोनच दिवसांपूर्वी बाहेर पडली. 'एनडीए' प्रवेशासाठीही महिलांना सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी लागली होती. 'ऑपरेशन सिंदूर'च्या काळात दररोज पत्रकार परिषदेत माहिती देणाऱ्या दोन महिला अधिकाऱ्यांचे चेहरे दिसत होते; परंतु त्याच वेळी सीमेचे प्रत्यक्ष रक्षण करणाऱ्यांमध्येही सीमा सुरक्षा दलाच्या रणरागिणी बंदुकीसह अन्य शस्त्रास्त्रे घेऊन सज्ज होत्या, हे कुणालाच माहीत नव्हते. पाकिस्तानचा हल्ला परतवून लावूनच केवळ त्या थांबल्या नाहीत, तर त्यांनी पाकिस्तानी सैनिकांना पळता भुई थोडी केली.

आता 'ऑपरेशन सिंदूर'शी संबंधित अनेक कथा समोर येत आहेत. पाकिस्तानने ८, ९ आणि १० मे रोजी भारतीय चौक्या आणि नागरी क्षेत्रांवर जोरदार गोळीबार केला. या दरम्यान, भारतीय सीमा सुरक्षा दलाच्या सात महिला सैनिकांनी काश्मीरमधील अखनूर सेक्टरमध्ये त्यांच्या पदांचा कार्यभार स्वीकारला. असिस्टंट कमांडंट नेहा भंडारी यांच्या नेतृत्वाखाली सहा शूर सैनिकांनी तीन दिवस आणि तीन रात्री दोन महत्त्वाच्या सीमा चौक्यांचे रक्षण केले. पाकिस्तानकडून झालेल्या प्रचंड गोळीबार आणि तोफगोळ्यांना न जुमानता या महिला केवळ धैर्याने लढल्या नाहीत, तर शत्रूला माघार घेण्यास भाग पाडले. 'बीएसएफ'च्या या शूर मुलींनी पुरुष सैनिकांच्या खांद्याला खांदा लावून शत्रूचा सामना केला. भंडारी यांनी त्यांच्या कंपनीची कमान स्वीकारली आणि घुसखोरी रोखलीच नाही, तर पाकिस्तानी चौक्यांवर हल्लाही केला. नेहा म्हणाली, 'आम्हाला पुरुषांसारखेच कठीण प्रशिक्षण देण्यात आले आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये आम्ही एक इंचही मागे न हटण्याचा निर्णय घेतला.' तिच्या धाडसाचे 'बीएसएफ'चे उपमहानिरीक्षक एस.एस. मंद यांनी कौतुक केले. सक्रिय युद्ध परिस्थितीत महिला सैनिकांनी इतकी मोठी भूमिका बजावण्याची ही पहिलीच वेळ होती. त्यातून पुरुष सैनिकांच्या बरोबरीची त्यांची क्षमता सिद्ध धाली. फक्त तीन वर्षांपूर्वी 'बीएसएफ'मध्ये सामील झालेल्या नेहा भंडारीच्या नेतृत्वाखाली मनजीत कौर, मलकीत कौर (पंजाब), स्वप्ना रथ, शंपा बसक (पश्चिम बंगाल), सुमी जेस (झारखंड) आणि ज्योती बानियान (ओडिशा) या सहा महिला सैनिकांनी मिळून अखनूरच्या दोन चौक्या वाचवल्या. यापैकी चार महिला २०२३ मध्ये भरती झाल्या होत्या, तर मनजीत आणि मलकीत यांना १७ वर्षांचा अनुभव होता. सियालकोट सेक्टरमध्ये पाकिस्तानकडून जोरदार गोळीबार होऊनही या शूर सैनिकांनी हार मानली नाही. त्यांनी सपाट मार्ग आणि प्रादेशिक शस्त्रांचा वापर करून पाकिस्तानी चौक्यांचे मोठे नुकसान केले, त्यानंतर शत्रूला त्यांच्या पुढच्या चौक्या सोडून पळून जावे लागले. 'बीएसएफ'चे डीआयजी वरिंदर दत्ता म्हणाले, की नेहाने केवळ बीएसएफ जवानांचेच नव्हे, तर सैन्याच्या अतिरिक्त तुकड्यांचेही नेतृत्व केले. तिने शस्त्रे आणि तोफांचा वापर करण्याचे निर्णय स्वतंत्रपणे घेतले. एका महिला अधिकाऱ्याने सक्रिय युद्धात पहिल्यांदाच अशी कामगिरी केली. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये ७० हून अधिक पाकिस्तानी चौक्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. 'बीएसएफ'ने सांबा, कथुआ आणि जम्मू सेक्टरमध्ये ७० हून अधिक पाकिस्तानी चौक्या आणि तीन दहशतवादी लाँचपॅड उद्ध्वस्त केले. या यशाचे स्मरण करण्यासाठी 'बीएसएफ'ने सांबा सेक्टरमधील एका चौकीला 'सिंदूर' असे नाव देण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या ऑपरेशनमध्ये हुतात्मा झालेल्या सैनिकांची नावे आणखी दोन चौक्यांना नावे दिली जातील. 'ऑपरेशन सिंदूर' ही महिला देशाच्या सुरक्षेत समान भूमिका बजावू शकतात, हे दाखवण्याची संधी होती. नेहा भंडारी आणि त्यांच्या टीमने हे सिद्ध केले की, महिलादेखील सक्रिय युद्धभूमीवर पुरुषांसारख्याच धैर्याने आणि दृढ निश्चयाने लढू शकतात. ही कारवाई लष्करी सेवेतील महिलांसाठी एक नवी प्रेरणा बनली आहे. महिला जवानांना पुरुष कर्मचाऱ्यांइतकेच खडतर प्रशिक्षण घ्यावे लागले. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान त्यांनी त्याच भावनेने सीमांचे रक्षण केले. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान त्यांनी पाकिस्तानी चौक्यांना लक्ष्य केले आणि आपल्या स्थानापासून एक इंचही मागे हटल्या नाहीत. सीमेवर असलेल्या चौक्यांवर ठाण मांडून पाकिस्तानी सैन्याचा आणि दहशतवाद्यांचा हल्ला परतवून लावला. सीमा सुरक्षा दलाच्या महिला जवानांनी केवळ शत्रूचाच धाडसाने सामना केला नाही, तर देशाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांची पूर्ण जाणीव असल्याने दाखवून देत देशालाही आश्वस्त केले. कथुआ, सांबा आणि जम्मू सेक्टरमधील सीमा चौक्यांवर शत्रूंचा सामना करणाऱ्या भारतीय सीमा सुरक्षा दलाच्या या तरुणी केवळ देशाच्या सीमांचे रक्षण करत नाहीत, तर धैर्य आणि दृढनिश्चयाचे जिवंत उदाहरण ठरतात. ही कारवाई संरक्षणात महिलांच्या वाढत्या भूमिकेतील एक मैलाचा दगड मानली जात आहे.

# ट्रम्प यांच्या मनमानीला चाप



**विश्वभ्रमण**

**– प्रा. जयसिंग यादव**

एकाधिकारशाही अंगात मुरलेले लोक कुणालाही जुमानत नाहीत. अशा व्यक्ती न्यायालयाच्या विरोधातही बोलत असतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्यापैकीच एक. अमेरिका ही जागतिक महासत्ता असली, तरी तिला आणखी मोठे करण्याची त्यांची धडपड आहे. ती वावगी नाही; परंतु त्यासाठी ते घटनात्मक मूल्यांचा अवमान करून सर्वाधिकार स्वतःकडे घेऊ पाहतात. त्यांच्या या वृत्तीला न्यायालयाने चाप लावला, हे बरे झाले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना जगातील एकमेव मोठा नेता होण्याची घाई झाली आहे. इतरांना ते कस्पटासमान लेखतात. अमेरिकेचे भले करण्याचा मक्ता केवळ आपल्याकडेच आहे, असे मानून ते निर्णय घेतात. अमेरिकेच्या अध्यक्षांना आणीबाणीच्या काळात विशेषाधिकार मिळतात. सध्या अमेरिकेत आणीबाणी नाही; परंतु तरीही अमेरिकेचे जगातील अनेक देशांशी असलेल्या व्यापारातील असंतुलन कमी करण्यासाठी त्यांनी 'जशास तसा कर' ही टूम काढली. आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत निर्णय घेण्याचे अधिकार ट्रम्प यांना नाहीत. हे अधिकार अमेरिकेच्या सिनेटला आहेत. ट्रम्प यांनी जशास तशा कराराची घोषणा केल्यानंतर त्यांच्याच पक्षातून विरोध झाला. त्यांचे सल्लागारही त्यांच्यासोबत राहिले नाहीत. एलॉन मस्क यांच्यासारख्यांनी साथ सोडली, तरी ट्रम्प यांना त्याचे काहीच वाटले नाही. जगातील देशांवर कर लादून आपण अमेरिकनांचे भले करू इच्छितो, हा त्यांचा भ्रम आहे. त्यांच्या कररचनेमुळे अमेरिकन निर्यातदार नाराज झाले. युरोपीय महासंघ अमेरिकेचा मित्र होता; परंतु युरोपीय संघानेही अमेरिकेला इशारा दिला. कॅनडा, मेक्सिको सारख्या देशांबाबत तर त्यांना माघार घ्यावी लागली. सर्वाधिक कर लादलेल्या चीनशीच अमेरिकेने सर्वात अगोदर सविस्तर व्यापार करार केला. या पार्श्वभूमीवर अलिकडेच अमेरिकेतल्या एका संघीय न्यायालयाने ट्रम्प यांना मोठा धक्का दिला. न्यायालयाने त्यांचे 'लिबरेशन डे' व्यापार आदेश अवैध घोषित केले आणि एकतर्फी कर लादण्याच्या अधिकारापुढेही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

ट्रम्प यांनी अनेक देशांवर मनमानी कर लादले होते. आशियातील शेअर बाजारांवर याचा मोठा परिणाम झाला होता. करांच्या मुद्द्यावरून अमेरिका आणि चीन आमनेसामने आले होते आणि अनेक दिवस तणाव होता. काही दिवसांनंतर दोन्ही देशांमधील तणाव कमी झाला होता. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की ट्रम्प यांनी जागतिक कर लादण्यासाठी येथील आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्तींचा वापर केला आणि असे करून त्यांनी आपल्या अधिकारांचे उल्लंघन केले आहे. न्यायाधीशांच्या पॅनेलने म्हटले आहे की व्हाईट हाऊसने या प्रकरणात पूर्णपणे कायद्याविरुद्ध काम केले आहे. न्यायालयाने म्हटले आहे, की लागू केलेले कर आदेश राष्ट्रपतींना उपलब्ध असलेल्या कोणत्याही अधिकारापेक्षा जास्त आहेत. न्यायालयाच्या निर्णयानंतर ट्रम्प यांचे सर्वात महत्वाचे व्यापार धोरण थांबवण्यात आले आहे. न्यायालयाचा हा निर्णय ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांना मोठा धक्का आहे कारण त्यांनी ते देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन म्हणून सादर केले होते. भारतातील सर्वोच्च न्यायालयाने जसा राष्ट्रपती आणि राज्यपालांनी विधेयकांबाबत ठराविक कालावधीत निर्णय घ्यावा, असा आदेश दिला आणि त्यानंतर राज्यपालांना आणि राष्ट्रपतींना तो आपल्या अधिकारात हस्तक्षेप वाटला, तसाच हस्तक्षेप ट्रम्प समर्थकांना वाटला. न्यायालयाच्या निर्णयावर 'व्हाईट हाऊस'ने टीका केली. हे एक प्रकारचे न्यायालयीन अतिक्रमण आहे. निवडणुकीशिवाय आलेल्या न्यायाधीशांनी राष्ट्रीय आणीबाणीला कसे सामोरे जायचे हे ठरवू नये, अशी टीका करण्यापर्यंत व्हाईट हाऊसची मजल गेली.

ट्रम्प यांनी अमेरिकेला प्रथम स्थान मिळवून देण्याचे वचन दिले आहे आणि त्यांचे प्रशासन अमेरिकेची महानता पुनर्संचयित करण्यासाठी आवश्यक ते प्रत्येक पाऊल उचलण्यास वचनबद्ध आहे, असे 'व्हाईट हाऊस'ने म्हटले आहे. या प्रकरणी न्यायालयात दोन वेगवेगळे खटले दाखल करण्यात आले. एक खटला 'व्हीओएस सिलेक्शन्स' ही दारू उत्पादक कंपनी आणि इतर चार अमेरिकन कंपन्यांच्या वतीने दाखल करण्यात आला. या कंपन्यांनी म्हटले होते की शुल्क लादल्यामुळे त्यांच्या व्यवसायाचे मोठे नुकसान झाले आहे, तर दुसरा खटला ओरेगॉनच्या नेतृत्वाखालील बारा राज्यांनी दाखल केला होता. सरकारी संस्थांनी खरेदी केलेल्या वस्तूंच्या किमती या शुल्कामुळे वाढतील, असा याचिकाकर्त्यांचा दावा होता. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारच्या वतीने न्यायालयात उपस्थित असलेल्या वकिलांनी ट्रम्प यांच्या शुल्क धोरणावर कायदेशीर बंदी घालण्यामुळे अमेरिकेच्या जागतिक स्थानाला धक्का बसेल, असा युक्तिवाद केला; परंतु न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाचे युक्तिवाद फेटाळून लावले आणि म्हटले की, राजकीय कारणांमुळे, राष्ट्रपतींना कायद्यानुसार जे करण्याची परवानगी नाही, ते करण्याची परवानगी देता येणार नाही. ट्रम्प यांनी अनेक देशांवर शुल्क लादले, तेव्हा त्याला तीव्र विरोध झाला होता. त्यानंतर, व्हाईट हाऊसने एक पाऊल मागे घेत शुल्क दर कमी केले. यासोबतच अमेरिकेने चीनसोबत सुरू असलेला संघर्ष कमी करण्याचा प्रयत्नही केला. अमेरिकेच्या जनतेने अध्यक्षपदी निवडून दिले, म्हणजे काहीही करायला परवानगी मिळाली, अशा थाटात डोनाल्ड ट्रम्प वावरत होते.

गेल्या जानेवारीमध्ये नागरिकत्वाच्या मुद्द्यावरून अमेरिकेच्या न्यायालयाने फटकारूनही ट्रम्प यांना शहाणपण आले नव्हते. त्यांचे अनेक निर्णय घटनात्मक पेच निर्माण करणारे होते. भारत-पाकिस्तान संबंधात नाक खुपसणे असो वा टॅरिफ वॉर; ट्रम्प यांनी वादग्रस्त निर्णयांचा सिलसिला सुरू ठेवला. त्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या न्यायालयानेच ट्रम्प यांच्या निर्णयाला स्थगिती दिली आणि त्यांना चांगले फटकारले हे बरे झाले. या निमित्ताने ट्रम्प यांना न्यायालयाकडून मोठा झटका बसला. अमेरिकेतील मॅनहॅटन येथील एका संघीय न्यायालयाने ट्रम्प यांनी लादलेल्या 'लिबरेशन डे टॅरिफ'वर बंदी घातली आहे. न्यायालयाने निकाल देताना म्हटले आहे की अध्यक्षांनी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर केला असून अमेरिकन संविधानाविरुद्ध पावले उचलली आहेत. तथापि, ट्रम्प प्रशासनाने आपल्या निर्णयाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आणि टॅरिफ कायम ठेवण्याचा आग्रह धरला. ट्रम्प प्रशासनाने न्यायालयात युक्तिवाद केला की, या प्रकरणातील कायदेशीर अडचणीमुळे चीनसोबतच्या असमान व्यापार संघर्षाची दिशा बदलू शकते आणि भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या युद्धबंदीचा अंत होऊ शकतो. ट्रम्प प्रशासनाने दावा केला की, अध्यक्षांनी मे महिन्याच्या सुरुवातीला भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी करण्यासाठी आपल्या टॅरिफ अधिकाराचा वापर केला होता. अमेरिकेने भारत आणि पाकिस्तानमधील तणाव थांबवण्यासाठी टॅरिफ वॉरचा उपयोग केल्याचा दावा केला होता. त्यावरूनही न्यायालयाने त्यांना फटकारले.

ट्रम्प प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितले, की अनेक देशांसोबत टॅरिफबाबत व्यापार चर्चा सुरू असून व्यापार करारांना अंतिम रूप देण्याची शेवटची तारीख ७ जुलै आहे. अध्यक्षांचा हा युक्तीवाद न्यायालयाने फेटाळून लावला. 'कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेड'च्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने म्हटले की, अमेरिकन संविधानानुसार परदेशी देशांसोबत व्यापार नियंत्रित करण्याचा अधिकार फक्त अमेरिकन काँग्रेस म्हणजेच संसदेला आहे, अध्यक्षांना नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की हा विषय राष्ट्रपतींच्या आणीबाणीच्या अधिकारांतर्गत येत नाही. कायदा ट्रम्प यांना आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्याअंतर्गत टॅरिफ लादण्याचा अमर्याद अधिकार देत नाही. अमेरिकेच्या अध्यक्षांना कररचनेचा अमर्याद अधिकार आहे, असा दावा करण्यात आला; परंतु न्यायालयाने अमेरिकन संविधानानुसार, टॅरिफ लादण्याचा अधिकार संसदेकडे म्हणजेच काँग्रेसकडे आहे, असे मत नोंदवताना अध्यक्षांना केवळ असाधारण आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये मर्यादित अधिकार मिळतात; परंतु ट्रम्प यांच्या बाबतीत अशी कोणतीही वैध आणीबाणी नव्हती, असे निदर्शनास आणले आहे. १९७१ मध्ये तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनीही आणीबाणीच्या अंतर्गत शुल्क लादले होते आणि न्यायालयाने ते मंजूर केले होते. अध्यक्षांनी आणीबाणी जाहीर केल्याची वैधता ठरवणे हा न्यायालयाचा नव्हे, तर काँग्रेसचा विशेषाधिकार आहे. ट्रम्प प्रशासनाने केलेले हे युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावले.

अमेरिकेच्या 'कमांडर-इन-चीफ'ने २ एप्रिल रोजी बहुतेक व्यापारी भागीदारांवर दहा टक्के बेसलाइनसह शुल्क जाहीर केले. अमेरिकेची सर्वात जास्त व्यापार तूट असलेल्या, विशेषतः चीन, युरोपीय महासंघ आणि भारत अशा देशांवर अमेरिकेतर्फे उच्च दर लागू करण्यात आले. यापैकी अनेक देशांवरील नवे शुल्क एका आठवड्यानंतर थांबवण्यात आले. ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाला अमेरिकेतील व्यापारी संघटनांनी आव्हान दिले होते.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

# पेमगिरीत महिलांसाठी आज वटपौर्णिमा उत्सव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील स्वराज्य संकल्प भूमी मोरदरा येथील महाकाय वटवृक्षाच्या परिसरात जाकमत बाबा आणि महायुती संगमनेर तालुका महिला आघाडीच्या वतीने खास महिलांसाठी उत्सव माझ्या कुंकवाचा वटसावित्री पौर्णिमेचा या कार्यक्रमाचे आज, दि. १० जून २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील मोरदरा परिसरात इतिहासकालीन महा काय वटवृक्ष आहे. महाकाय वटवृक्षाच्या सानिध्यात महिलांचा वटसावित्री पौर्णिमा उत्सव साजरा व्हावा, यासाठी जाकमत बाबा तरुण मित्र मंडळ आणि संगमनेर तालुका महायुती महिला आघाडी यांच्या वतीने कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे.

### सौ. विखेंसह खताळ मार्गदर्शन करणार

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, धनश्रीताई विखे पाटील आणि नीलमताई खताळ या महिला मान्यवर उपस्थित राहुन सर्व महिलांना मार्गदर्शन करणार आहे.



महिलांनी महिलांसाठी ठेवलेल्या या कार्यक्रमासाठी संगमनेर तालुक्यातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संगमनेर तालुका महायुती महिला आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

# वीज कोसळून कांद्याची चाळ खाक

## कष्टाची झाली राख; शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : वैजापूर तालुक्यातील नादी शिवारात दि. ७ जून रात्री झालेल्या मुसळधार पावसादरम्यान मोठी दुर्घटना घडली. शेतातील कांदा चाळीवर वीज कोसळून भीषण आग लागल्याने संपूर्ण कांदा साठा जळून खाक झाला. या दुर्घटनेत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

शनिवारी रात्री जोरदार वारे आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झाला. या पावसादरम्यान वैजापूर तालुक्यातील नादी शिवारात वीज कोसळून शेतकऱ्याच्या कांदा चाळीला आग लागली. ही घटना इतकी भीषण होती की बघता बघता चाळीतील साठवलेल्या कांद्याचे पाच ते सहा ट्रॅक्टर इतके प्रमाण पूर्णपणे जळून खाक झाले.

ही कांदा चाळ शेतकरी श्यामराव सखाहरी कदम (रा. वीरगाव) यांची होती.

### प्रशासनाने त्वरित शेतकऱ्याला मदत द्यावी

शेतमालाची साठवणूक सुरक्षित आणि आधुनिक पद्धतीने कशी करावी, याकडे प्रशासन व कृषी विभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. या दुर्घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. शेतकरी कदम यांनी शासनाकडे नुकसानभरपाईची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनाने तातडीने पंचनामा करून शेतकऱ्याला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.



त्यांनी नादी शिवारातील गट क्रमांक २०५ मधील त्यांच्या शेतात कांदा साठवून ठेवलेला होता. मात्र निसर्गाच्या कोपापुढे त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. आगीच्या या दुर्घटनेत कदम यांचा संपूर्ण कांदा साठा जळून गेला आहे. पाच ते सहा ट्रॅक्टर इतक्या मोठ्या प्रमाणात कांदा नष्ट झाल्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.

या नुकसानीमुळे कदम कुटुंबावर मोठा आर्थिक भार ओढवला आहे. हा प्रकार शेतकऱ्यांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. हवामान बदलाचा फटका शेतकऱ्यांना वेळोवेळी बसत असून, नैसर्गिक आपत्तींमुळे शेतमालाचे मोठे नुकसान होत आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## कार्यकर्त्यांनो, समाजहितासाठी काम करा

वसाहत उपाध्यक्ष केशवराव भवर, माजी सभापती पं. स. मच्छिंद्र केकाण, विलासराव वाबळे, सोपानराव पाणगव्हाने, ज्ञानेश्वर होन, कैलास माळी, रमेश घोडेराव, संभाजीराव गावंड, रघुनाथ फटंगारे, फकिरराव बोरणारे, दीपकराव चौधरी, दगूराव चौधरी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अमोल गवळी, मा. सरपंच बाळासाहेब पाणगव्हाने, मा. सभापती सुनीलराव देवकर, मा. तालुकाध्यक्ष युवा मोर्चा विक्रम पाचोरे, राजेंद्र गवळी, डी. पी. मोरे, निवृत्ती बनकर, शिवाजीराव जाधव, संदीपराव देवकर, शिवाजीराव कदम, विजयराव कदम, किरण कोळपे, बापूसाहेब पवार, शब्बीर पटेल, पुंजाजी राऊत आदीसह मान्यवर उपस्थित होते. गेले अनेक वर्षे माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या विचाराने काम करतो आहोत. अन्यायाच्या विरोधात वाचा फोडणारे म्हणून आपली ओळख आहे. मतदारसंघात विकासकामे आणि समस्यांच्या सुटण्याबाबत होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आपण कुठेही मागे हटणार नाही, याउलट शासनाला ते प्रश्न निदर्शनास आणून देऊन जनतेला न्याय मिळवून देणे हे आपले कर्तव्य समजून काम करू. पक्षाचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून लोकहिताच्या असणाऱ्या योजनेचा लाभ जनतेला मिळवून देणे ही भूमिका आपले उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमाने कोपरगाव मतदारसंघातील एकात्मता, कार्यकर्त्यांचा सन्मान आणि पक्षवाढीचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. भारतीय जनता पक्षाचे ध्येय धोरण पुढे घेऊन जात सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्याचे काम कायम कोल्हे कुटुंब करत आले आहे. जगातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पक्ष आहे. त्याचे अध्यक्ष म्हणून मतदारसंघात पक्ष वाढीसाठी कदम यांनी जोमाने काम करावे, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

## क्रुझर-ट्रकचा अपघात

मृत्यू झाला तर गंभीर जखमी झालेला वृषभ बबन सोनवणे याचा उपचारादरम्यान नगर येथील रुग्णालयात मृत्यू झाला. अहिल्यानगर ते संभाजीनगर महामार्गावर नेवासा तालुक्यातील उस्थळ दुमाला गावा नजिक सोमवारी (दि. ७) पहाटे सव्वापाच वाजण्याच्या सुमारास क्रुझर गाडीने ट्रकला पाठीमागील बाजुस धडक दिल्याने क्रुझर गाडीमधील इतर ११ मुले जखमी झाली. त्यांच्यावर नेवासा फाटा येथे उपचार चालू आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक धनंजय जाधव व पोलिस कर्मचारी तत्काळ हजर झाले व जखमींना नेवासा फाटा येथील रुग्णालयात उपचारसाठी हलविण्यात आले. या अपघातात अकादमीचे एक शिक्षकही गंभीर जखमी झाले आहेत. घटनास्थळी पहाटे ५ सुमारास हायवे वर वाहतूक कोंडी झालेली होती. क्रुझर चालकाने हलगर्जीपणा करून गाडी काढून पुढे जाण्याचा प्रयत्न केला रस्त्यावर उभ्या असलेल्या मालट्रक (क्र. एमएच ११ एएल ५११७) या गाडीला जोरदार धडक बसून क्रुझर घासल्याने आतील विद्यार्थी जखमी झाले व दोघे ठार झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत क्रिकेट प्रशिक्षक गौरव सुनिल भोई यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नेवासा पोलिसांनी क्रुझर चालक अविनाश ऊर्फ रोशन गोकूलसिंग निकम यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेंद्र ससाणे तपास करीत आहेत.

## ...आता तत्काळ समस्या सोडविता येणार

समस्या सोडवताना अडथळे येतात किंवा उपाययोजनांसाठी वेळ लागतो. त्यामुळे महानगरपालिकेची यंत्रणा अत्याधुनिक साहित्य, साधन सामग्रीसह सज्ज असणे आवश्यक आहे. त्यामुळे हे नवीन वाहन उपलब्ध करून देण्यात आले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून, या काळात निर्माण होणाऱ्या अडचणी, समस्या सोडवण्यासाठी याचा प्रभावीपणे वापर होईल, असा विश्वासही आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे म्हणाले की, ड्रेनेज लाईन, चेंबर साफसफाईसाठी ही गाडी राज्य शासनाकडून आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. १८.५० टन क्षमतेच्या या वाहनात तीन प्रकाराच्या सुविधा उपलब्ध आहेत. ड्रेनेज, चेंबरमधील मैला उपसा करून त्यावर या गाडीतच प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे प्रक्रिया होऊन उपलब्ध होणारे पाणी जेटिंगसाठी वापरता येते. त्यासाठी वाहनात नव्याने पाणी भरण्याची आवश्यकता नाही. या वाहनात ८ हजार लिटर क्षमतेची टाकी आहे. दुसरे वाहन ७ टन क्षमतेचे असून त्यात ३ हजार लिटर क्षमतेची टाकी आहे. वाहन चालक व कर्मचाऱ्यांना उत्तमरीत्या प्रशिक्षण देऊन तयार केलेले आहे. या वाहनामुळे कुठलाही भार महानगरपालिकेवर पडणार नाही. थ्री इन वन वाहन असल्याने व प्रतिदिन सलग आठ तास काम करण्याची या गाडीची क्षमता असल्याने नागरिकांच्या समस्या वेळेत व अधिक चांगल्या पद्धतीने सोडवता येतील.

## 'शनि' देवस्थानचे विश्वस्त मंडळ बरखास्त करा

सदर ॲप अन्वये जमा झालेल्या खात्यामधून व काही ॲपच्या संगमताने आपल्या वैयक्तिक आर्थिक हितासाठी स्वतःच्या नावे वर्ग करून खूप मोठा आर्थिक घोटाळा केलेला आहे. अद्यापही भक्तांची लूट सुरूच आहे तसेच शनेश्वर देवस्थानचे २२ मे २०२५ रोजी दर्शन ॲप बंद केल्याचे आव्हान केले. परंतु त्यामध्ये ॲप कोणत्या नावाने आहे. किती अँप आहे. हे जाहीर केले नाही.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय– गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय– जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ※ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# स्मार्ट मीटरविरोधात सर्वपक्षीयांचे आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी शहरात महावितरणकडून जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसवण्याच्या मोहिमेविरोधात नागरिक आणि सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन छेडले.

सोमवारी महावितरणच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करत कार्यकर्त्यांनी स्मार्ट मीटर बसवणे त्वरित थांबवण्याची मागणी केली. यावेळी आंदोलक आणि अधिकाऱ्यांमध्ये तीव्र शाब्दिक चकमक झाली. ठेकेदाराने जबरदस्ती कायम ठेवल्यास कडक कारवाईचा इशारा कार्यकर्त्यांनी दिला.

या आंदोलनात माजी नगरसेवक बंडू पाटील बोरुडे, भाजपचे मुकुंद गर्जे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे योगेश रासने, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष नासिर शेख, माजी नगरसेविका मनीषा उदमले, सुनील कदम, परवेज मणियार, भैय्या इजारे, सुंदरदास कांबळे, विवेक देशमुख, जब्बार आतारयांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.बंडू पाटील बोरुडे म्हणाले की, स्मार्ट मीटरमुळे तांत्रिक बिघाड वारंवार होत असून, नागरिकांना अवाजवी वीजबिले येत आहेत. हे काम त्वरित थांबवले नाही, तर पाथर्डी बंद करून तीव्र आंदोलन उभारू,'' असा इशारा त्यांनी दिला.विज चोरी होत असेल तर ती थांबवण्याचे काम प्रशासनाचे आहे. मात्र त्या चोरीचे ओझे सामान्य नागरिकांवर स्मार्ट मीटरच्या माध्यमातून



लादले जात आहे.

मुकुंद गर्जे म्हणाले, नागरिकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवणे त्वरित थांबवावे, अन्यथा तीव्र आंदोलन होईल,

योगेश रासने म्हणाले, तुम्ही जनतेचे सेवक आहात, हुकूमशाही खपवून घेणार नाही. नवीन वीज कनेक्शनसाठी स्मार्ट मीटरची सक्ती चुकीची आहे. तुम्ही अधिकारी झाला असलात तरी आम्ही जबरदस्ती सहन करणार नाही. ही बाब लक्षात ठेवा. जनतेच्या मागण्या मान्य कराव्याच लागतील, अशा ठाम शब्दांत रासने यांनी अधिकाऱ्यांना सुनावत सज्जड दम दिला.

असे त्यांनी ठणकावले. एक वर्षापूर्वीच मीटर बदलले असूनही पुन्हा पुन्हा त्याच त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हे स्मार्ट मीटर आमच्या शहरासाठी नको.

नासिर शेख म्हणाले, नागरिकांना धमक्या देणारी ही हुकूमशाही सहन करणार नाही, असे सांगत कायदा हातात घेण्यास भाग पाडू नका, असा इशारा दिला. स्मार्ट मीटर बसवण्यास नकार देणाऱ्या नागरिकांना ठेकेदाराकडून वीजपुरवठा खंडित करण्याच्या आणि विजेची चोरी केल्याचा गुन्हा दाखल करण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला. सर्वपक्षीय नागरिक समितीने नागरिकांना आवाहन केले की, स्मार्ट मीटर बसवण्यासाठी जबरदस्ती करणाऱ्यांविरोधात त्वरित संपर्क साधावा. ''आम्ही प्रत्येक नागरिकासोबत आहोत,'' असे समितीने म्हटले.

# बी. एड. च्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कॅम्पस इंटरव्ह्यू मध्ये विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. सचिन भोसले यांनी दिली.

साध्वी प्रितीसुधाजी इंग्लिश मिडीयम स्कूल, राहता येथे वैष्णवी शेळके, ऋतुजा निबे, रेणुका गायकवाड यांची तर आनंद निकेतन इंग्लिश मिडीयम स्कूल, मांडवे येथे पुजा झाडगे हिची निवड झाली. शाळेतील प्रतिनिधींनी बी. एड. महाविद्यालयात येऊन विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या, त्यामध्ये वरील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.संस्थेच्या मुख्य



कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालय विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याबरोबरच नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात अग्रेसर असल्याचे डॉ. सचिन भोसले सांगत महाविद्यालयाच्या माध्यमातून सक्षम विद्यार्थी घडवण्याचे प्रयत्न हे सुरू आहे. शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचा विद्यार्थी हा सर्व गुण संपन्न असावा त्याच्या माध्यमातून मुलांना संस्कार शिक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न महाविद्यालयाच्या माध्यमातून सुरू असतात. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ आदींनी अभिनंदन केले आहे.

# साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांची धावपळ

## अतिदक्षता बेडची संख्या वाढविण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहता :** शिर्डी येथील साई संस्थान संचलित श्री साईबाबा सुपर स्पेशलीटी रुग्णालयमध्ये अतिदक्षता बेडची संख्या ही अपुरी असल्यामुळे सर्व सामान्य नागरीकाणा आपल्या रुग्णांवर उपचार करणेसाठी धावपळ करावी लागत असल्याची बाब समोर आली आहे.

अपुऱ्या बेड अभावी बऱ्याच वेळा रुग्ण हे उपचारापासून वंचित राहत आहे या रुग्णालय मध्ये २९ अतिदक्षता बेड असून सदरील बेडची संख्या ही खूपच मोठ्या प्रमाणावर अपुरी आहे. या रुग्णालय




मध्ये संपूर्ण महाराष्ट्रा मधून रुग्ण हे उपचार घेणेसाठी येत असतात. बऱ्याच वेळा रूग्ण यांना अतिदक्षता बेड मिळत नाही. तसेच सदरील रुग्णालय मध्ये उपचार करणाऱ्या डॉक्टर यांची संख्या सुद्धा अपुरी आहे, त्यामुळे रुग्ण यांना वेळेवर दुसरे रुग्णालय शोधावे लागते.

अतिदक्षता बेड उपलब्ध नसल्यामुळे बऱ्याच वेळा सदरील ठिकाणी असलेले डॉक्टर हे पेशंटला इतरत्र हलवण्याचा सल्ला देतात. त्यामुळे गोरगरीब रुग्ण यांचे खिशाला एक प्रकारे कातर बसते. तरी तत्काल सदरील रुग्णालय मधील अतिदक्षता बेडची संख्या वाढवावी असे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आरोग्य मंत्री प्रकाश अबीटकर यांना शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने देण्यात आले आहे.

# शिवसेना पदाधिकाऱ्यांनी घेतली शिंदेची भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील तसेच तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन श्रीरामपूर तालुका तसेच शहरातील विविध विषयावरील समस्या मांडल्या.

शिवसेना शहर व तालुका संपर्क कार्यालयाच्या वतीने ठिकठिकाणी वृक्षारोपण मिठाई वाटप शालेय साहित्याचे वाटप आदी कार्यक्रम राबविले. याबाबत माहिती दिली. तसेच अतिक्रमणधारक, म्हाडाचे घरकुल, ग्रामीण भागातील विकास कामे याविषयी चर्चा करून लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. श्रीरामपूर येथील शिवसेना संपर्क कार्यालयाच्या वतीने उत्कृष्ट



### या कार्यकर्त्यांनी घेतली भेट

प्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश तांबे, युवा नेते रवींद्र जाधव पाटील, माजी उपजिल्हाप्रमुख देविदास सोनवणे, उपतालुकाप्रमुख सविताताई वाडीले, शिवसैनिक किशोर वडिले आदी पदाधिकारी उपस्थित होते. आभार रविंद्र जाधव पाटील यांनी मानले.

प्रकारे संपर्क अभियान तसेच विविध विकास कामाबद्दल चांगल्या प्रकारे पदाधिकारी नागरीकामधुन प्रतिसाद घेत असल्याबद्दल सर्व शिवसेना पदाधिकारी यांचे उपमुख्यमंत्री उपमुख्यमंत्री शिंदे यांनी कौतुक केले.

# बकरी ईद उत्साहात साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** मुस्लिम बांधवांनी ईद उल अजहा अर्थात बकरी ईद मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी केली. ईदगा मैदानावर सामूहिक नमाज पठणाचा कार्यक्रम पार पडला. मौलाना सैफुदीन यांच्या नेतृत्वाखाली



मुस्लिम बांधवांनी एकत्रित नमाज अदा केली. यावेळी मौलाना सैफुदीन यांनी देशात भाईचारा, जातीय सलोखा आणि शांतता कायम राहावी, तसेच आजारांनी त्रस्त आणि अडचणीत असलेल्यांना त्रासातून मुक्ती मिळावी, यासाठी अल्लाहकडे दुआ मागितली. ''आम्हाला चांगल्या मार्गावर चालण्याची सद्बुद्धी दे,'' अशी प्रार्थनाही त्यांनी केली.नमाज पठणानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांची गळाभेट घेत शुभेच्छा दिल्या.

पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक हरीश भोये, पोलिस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, विलास जाधव, निवृत्ती आगरकर, लक्ष्मण पवार, गुप्त वार्ता विभागाचे नागेश वाघ, विनोद मासळकर यांच्यासह अन्य पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांनी तालुक्याचा चौक बंदोबस्त ठेवला.

# राष्ट्रवादीचा आज वर्धापन दिन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांचे सारखे खंबीर नेतृत्व लाभलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या पक्षाचा यंदा १० जून रोजी २६ वा वर्धापन दिन सोहळा साजरा होत आहे.

निरंतर जनसेवेचा वसा अन् राष्ट्रवादी विचारांची कास धरत महाराष्ट्रभर यशस्वी वाटचाल करत असलेल्या पक्षाचा आनंद सोहळा मंगळवार, दिनांक १० जून रोजी दुपारी ३ वाजता श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे येथे पार पडत आहे.

पक्षाचे नेते अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यात पक्षाची घोडदौड सुरू आहे राज्यात गतिमान विकासाची ध्येय धोरणे, कामगार, कष्टकरी, शेतकरी, कामगार तसेच व्यापारी उद्योजक महिला यांच्या विकासाच्या धोरणात्मक निर्णयात राष्ट्रवादीचा सिंहाचा वाटा आहे राज्याच्या विकासाचा रथ पुढे नेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस बळकट करण्याचे काम पक्षाचे नेते नामदार अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. पक्षाच्या या वर्धापन दिन सोहळ्यास राज्यभरातील हजारो युवक व महिला कार्यकर्ते हाजरोंच्या संख्येने सहभागी होणार आहेत. बालेवाडी पुणे येथे पार पडणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पवार पार्टीच्या वर्धापन सोहळ्यात राज्यभरातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, (व्ही. जे.एन.टी.सेल) चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविकांत राठोड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (व्ही.जे.एन.टी.सेल) चे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास धनगर, सरसिटणीस टीशा मढेवार, आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

# वैद्यकीय कामाबाबत मंत्री देसाईंकडून कौतुक




**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहता :** पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उत्तर अहिल्यानगर जिल्ह्याच्या कामाचे कौतुक केले आहे.

मंत्री देसाई हे शिवसेना पदाधिकारी मेळाव्या निम्मित शिर्डी दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी साईसमाधीचे दर्शन घेतले. यावेळी शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे उत्तर अहिल्यानगर जिल्हा प्रमुख जितेंद्र जाधव व त्यांचे सहकारी यांनी मंत्री देसाई यांची भेट घेतली व शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या कामाबद्दल माहिती दिली. मंत्री देसाई यांनी उत्तर अहिल्यानगर शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कौतुक केले.

शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे मंगेश चीवटे व रामहरी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय मदत कक्षाचे जे काम सुरु आहे व त्या माध्यमातून राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना अजून कसा दवाखान्यासाठी फायदा मिळवून देता येईल. यासाठी प्रयत्न करत राहावे, अशी सूचना मंत्री देसाई यांनी केली. यावेळी संगमनेरचे आमदार अमोल खताळ, नेवासा येथील आमदार विठ्ठल राव लंघे, शिवसेनेचे अक्षय सदाफळ, साई कार्ले, सागर बोठे यासह शिवसैनिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

# दळणाच्या दरात १ जूनपासून वाढ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** गिरणी चालक-मालक संघटनेने १ जून २०२५ पासून लागू होणारे नवे दर जाहीर केले असून नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दळणासाठी नवे दर ठरवण्यात आले असून विविध धान्यांच्या दळणासाठीचे दर खालीलप्रमाणे आहेत: दळणाचे प्रकार व दर (प्रति किलो): गहू, ज्वारी आणि बाजरी सहा रुपये किलो तर तांदूळ, हरभराडाळ, पापड दाळ, भगर हे पंधरा रुपये किलो दर निश्चित करण्यात आले आहे. या सोबतच, जर ग्राहकांनी दळण पायलीवर (म्हणजे मोजमापाच्या पायली प्रमाणात) आणले, तर त्यासाठी दर पस्तीस रुपये प्रति पायली इतका आकारला जाणार आहे.

संघटनेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, वाढत्या महागाईमुळे आणि देखभाल खर्च वाढल्यामुळे नवे दर निश्चित करण्यात आले आहेत. हे दर सर्व गिरण्यांमध्ये एकसमान असतील आणि त्याचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ग्राहक व गिरणी चालक यांच्यात पारदर्शकता राखण्यासाठी हे दरपत्रक गिरण्यांमध्ये लावले गेले आहे. कोणत्याही प्रकारचा गैरवापर टाळण्यासाठी आणि योग्य सेवा मिळवण्यासाठी ग्राहकांनी अधिकृत दरपत्रकावर आधारितच व्यवहार करावेत, असे संघटनेने सांगितले आहे.

**जाहीर प्रगटन**

समस्त गावकरी कर्जत ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री. लियाकत तुराब झारेकरी रा. कर्जत ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर यांनी त्यांच्या नामे अमिना तुराब झारेकरी यांचे मृत्यू प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

सदरील व्यक्तीचा मृत्यू कर्जत ता. कर्जत जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी दि.२२/१०/१९८५ रोजी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणेसंबंधी दि.१५/०४/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तींच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०५/०६/२०२५

(गुरु बिराजदार)
तहसिलदार कर्जत

# शिवरायांचा संघर्ष वैश्विक मूल्यनिर्मितीचा होता

## अष्टवाडा येथे हिंदू साम्राज्य दिनाचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** आजच्या अस्थिर जागतिक वातावरणात भारतासमोर एक अनोखी आणि महत्त्वपूर्ण जागतिक भूमिका आहे, ती म्हणजे मानवजातीला समतेचा, शांतीचा व आध्यात्मिकतेचा मार्ग दाखवण्याची. मात्र ही भूमिका पार पाडण्यासाठी भारताने आधी स्वतः संघटित व अखंड होणे गरजेचे आहे. हीच भूमिका डोळ्यांसमोर ठेवून छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला संघर्ष केवळ स्वराज्यासाठी नव्हता, तर तो एक व्यापक, वैश्विक मूल्यनिर्मितीचा प्रयत्न होता. असे प्रतिपादन विश्व हिंदू




परिषद व बजरंग दल महाराष्ट्र-गोवा क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील अष्टवाडा येथील चौंडेश्वरी मंदिरात रविवारी सुवर्णयुग परिवार ट्रस्ट व सकल हिंदू समाज यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित हिंदू साम्राज्य दिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुकाध्यक्ष अरविंद पारगावकर, महादेव सोनवणे, किशोर परदेशी, महेश बाहेती मुकुंद गर्जे, सोमनाथ बंग आदी मान्यवर उपस्थित होते.कुलकर्णी म्हणाले, जगभरात संघर्ष, युद्ध आणि मतभेदांचे वाढते प्रमाण पाहता भारताला आता आपली ऐतिहासिक जबाबदारी स्वीकारून जगाला समतेचा आणि शांतीचा मार्ग दाखवावा लागेल. ही भूमिका पार पाडण्यासाठी शिवाजी महाराजांचे विचार आणि हिंदू संस्कृतीची मूल्ये आधारभूत ठरतील. छत्रपती शिवाजी महाराजांचा संघर्ष फक्त स्वराज्यासाठी नव्हता, तर धर्म, संस्कृती आणि समतेच्या जागतिक मूल्यांसाठी होता.

आदिनाथ महाराज म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करून संपूर्ण समाजासाठी आदर्श निर्माण केला. त्यांच्या जीवनशैलीतून आपल्याला प्रेरणा घेऊन मार्गक्रमण करावे लागेल. आजच्या काळात देव, देश आणि धर्मासाठी प्रत्येकाने निःस्वार्थ भावनेने व तळमळीने कार्य करणे आवश्यक आहे. शेवटी त्यांनी सर्वांना एकजुटीने राष्ट्रसेवेसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन शैलेज शिरसाट यांनी तर आभार अमोल भंडारी यांनी केले.

# ... अडथळा दूर न झाल्यास १४ जुलैपासून आंदोलन

## घनश्याम शेलार यांचा इशारा; शेख महंमद महाराज मंदिर जिर्णोध्दाराचा वाद मिटता मिटेना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** संत शेख महंमद महाराज यांच्या मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी असणारा अडथळा दुर न झाल्यास १४ जुलै २०२५ पासून तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे यात्रा कमिटी अध्यक्ष गोपाळ पाटील मोटे पालखी सोहळा समितीचे घनश्याम शेलार व बाबासाहेब भोस यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

शेख महंमद महाराज मंदिर जिर्णोध्दारात अडथळा असणाऱ्या धर्मादाय आयुक्त यांच्याकडील शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट व वफ बोर्डातील रजिस्ट्रेशन रद्द होत नाही. तोपर्यंत मंदिर जिर्णोध्दार करता येत नाही म्हणून १७ एप्रिल २०२५ ते २७ एप्रिल २०२५ पर्यंत यात्रा उत्सव समिती, गावकरी व वारकरी संप्रदायाच्या वतीने तहसील कार्यालयापुढे धरणे आंदोलन करण्यात आले.

मात्र त्यात प्रशासनाचा कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने २८ एप्रिल रोजी आत्मक्लेष आंदोलन सुरू केले. यावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी मध्यस्थी करून एक महिन्यात २८ मे २०२५ पर्यंत मुख्यमंत्री यांची बैठक घेऊन तोडगा काढू, असे आश्वासन दिल्याने गावकऱ्यांच्या अनुमतीने आंदोलन स्थगित करण्यात आले होते. मात्र अद्यापपर्यंत कुठलीही मुख्यमंत्र्यांची बैठक अथवा तोडगा निघाला नसल्याने गावकरी व वारकरी संप्रदाय आंदोलनातच्या पावित्र्यात आहे.

यावेळी बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, गोपाळ मोटे, एकनाथ आळेकर, नाना कोथिंबीरे, सुनील वाळके यांच्यासह यात्रा उत्सव समिती सदस्य पालखी सोहळा समिती सदस्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### बैठकीत घेतला आंदोलनाचा निर्णय

सध्या आषाढी एकादशीनिमित्त विविध ठिकाणचे पालखी सोहळे पंढरपुरकडे निघाले असल्याने पालखी सोहळे परत येईपर्यंत जीर्णोध्दरतील अडथळे दूर न झाल्यास १४ जुलै २०२५ पासुन वारकरी संप्रदायाच्या मार्गदर्शनाखाली गावकरी, वारकरी व यात्रा उत्सव समिती पालखी सोहळा समितीचे वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा निर्णय कार्यकर्ता बैठकीत घेण्यात आला.



---

# 'शिवशंकर' विजेता तर 'स्वामी समर्थ' उपविजेता

## आ. जगताप यांच्या मार्गदर्शनाखालील महाकाय चषक क्रिकेट स्पर्धा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** वाडिया पार्क मैदानावर अखंड गवळी समाज व आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित महाकाय चषक क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी स्व. माजी आ. अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या स्पर्धेचे विजेतेपद शिवशंकर वारियर्स संघाने पटकावले तर उपविजेतेपद स्वामी समर्थ स्ट्राईकर्स संघाला मिळाले. या दोन्ही संघांमधील सामना अतिशय चुरशीचा झाला. तर तृतीय पारितोषिक सम्राट किंग इलेव्हन व उत्तेजनार्थ पारितोषिक मुंजोबा वॉरियर्स संघाने पटकविले, असल्याची माहिती माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी दिली.

अखंड गवळी समाज आयोजित महाकाय चषक क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण गुणे आयुर्वेदिक कॉलेजचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, संतोष गेनाप्पा, दत्तात्रय भागानगरे, दत्ता खैरे, निलेश निस्ताने, ऋषिकेश गोंधळे, रोहित टोकेफळकर, बाली बांगरे, अक्षय नामदे, चंद्रकांत औशीकर, निलेश खताडे, सुनील लालबेंद्रे, किशोर नामदे, गौरव हरबा, सागर चवंडके, भगवान कुरधने आदी उपस्थित होते

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये टीव्ही, मोबाईल या साधनांमुळे युवा पिढी मैदानी खेळापासून लांब चालली आहे. विद्यार्थ्याला शालेय शिक्षणाबरोबरच आपल्या आवडीच्या खेळाचे धडे देणे गरजेचे आहे. आता विविध क्रीडा क्षेत्रामध्ये देखील करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहे. खेळामुळे मनुष्याचे आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होत असते.

**– सचिन जगताप**



# अरुणोदय गोशाळेचे कार्य आदर्शवत : मुंदडा

## स्व. माजी आ. अरुणकाका जगताप यांच्या कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते व विधान परिषदेचे माजी आ. स्व. अरुणकाका जगताप यांच्या निधनानंतर त्यांच्या निवासस्थानी भेट देत आ. संग्राम जगताप व कुटुंबीयांचे सांत्वन केले.

याप्रसंगी बोलताना मुंदडा यांनी स्व. अरुण काकांच्या सामाजिक व जनतेसाठी केलेल्या कार्याची आठवण करून दिली. त्यांनी स्थापन केलेल्या अरुणोदय गोशाळा या संस्थेमार्फत गावागावात गोसेवा ही केवळ धार्मिक परंपरा नसून सामाजिक बांधिलकी म्हणून कशी जोपासली जाऊ शकते, याचे उत्तम उदाहरण त्यांनी दिले.

गोसेवा ही ग्रामीण संस्कृतीची मुळं आहेत. स्व. अरुणकाकांनी ती आपल्या कृतीतून साकारली. त्यांच्या या कार्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळत आहे, असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.

स्व. अरुण काकांनी गोसेवेच्या माध्यमातून समाजात एक वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या निधनामुळे जिल्ह्याने एक सच्चा जननेता व गोसेवक गमावला आहे.

**– शेखर मुंदडा,**
अध्यक्ष: गोसेवा आयोग



---

# पाथर्डीत अल्पवयीन मुलींचे विवाह रोखले

## चाईल्ड लाईन आणि पोलिसांच्या गुप्त माहितीवरून तातडीची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यातील कारेगाव येथे दोन अल्पवयीन मुलींचे विवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे. चाईल्ड लाईनला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिस, ग्रामविकास विभाग आणि बाल संरक्षण समितीच्या पथकाने संयुक्त कारवाई करत ही लग्ने थांबवली. रविवारी सकाळी १० वाजता सुरू झालेली ही कारवाई सायंकाळी ४ वाजता पूर्ण झाली. या प्रकरणी वर, वधू आणि त्यांच्या कुटुंबीयांचे जबाब नोंदवून त्यांना अहिल्यानगर येथील बाल संरक्षण समितीसमोर हजर राहण्याचे लेखी पत्र देण्यात आले आहे.



चाईल्ड लाईनला कारेगाव येथे दोन अल्पवयीन मुलींचे विवाह होणार असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे चाईल्ड लाईनने तातडीने पोलिस आणि ग्रामविकास विभागाशी संपर्क साधला. यावेळी पोलिस, ग्रामविकास विभागाचे अधिकारी आणि बाल संरक्षण समितीचे सदस्य कारेगाव येथे पोहोचले. त्यांनी विवाहाच्या तयारीची पाहणी केली आणि मुलींचे वय तपासले. दोन्ही मुली अल्पवयीन असल्याचे आढळून आल्याने लग्न थांबवण्यात आले.

या कारवाईदरम्यान, प्रशासनाने वर, वधू आणि त्यांच्या आई-वडिलांचे जबाब नोंदवले. यानंतर, सर्व संबंधितांना अहिल्यानगर येथील बाल संरक्षण समितीसमोर हजर राहण्याचे लेखी पत्र देण्यात आले. या पत्रात पुढील सुनावणी आणि कायदेशीर प्रक्रियेसाठी हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, अल्पवयीन मुलींच्या संरक्षणासाठी आवश्यक पावले उचलण्याचे निर्देशही देण्यात आले. अल्पवयीन मुलींचे विवाह रोखणे ही सामाजिक प्रगतीसाठी महत्त्वाची बाब आहे. अशा कारवायांमुळे समाजात जागरूकता निर्माण होईल, असे मत व्यक्त होत आहे.

# वर्षभरापासून फरार असलेला सराईत गजाआड

## राहुरी पोलिसांनी आवळल्या मुसक्या; राहुरी पोलिसांचे सर्वत्र कौतुक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असलेला अन् वर्षभरापासून फरार असलेल्या अट्टल आरोपीच्या राहुरी पोलिसांनी मुसक्या आवळल्या असून त्याला आज पोलीस कोठडी सुनावली आहे. फरार आरोपी पकडण्यात आल्याने राहुरी पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

राहुरी तालुक्यातील पश्चिमेला असणाऱ्या ताहाराबाद येथील इंडियन आईलचे पेट्रोल पंपावरून पेट्रोल भरून गावाकडे जात असताना पेट्रोलपंपासमोरील रस्त्यालगत आरोपी अविनाश भिकन विधाते (वय २९, रा. ताहाराबाद) याने मोबाईल पडला असे म्हणाला असता, फिर्यादी व साक्षीदार थांबले होते.



यावेळी विधाते हे त्यांच्याकडे पळत येवुन त्यांना शिवीगाळ करून लाथाबुक्कयाने मारहाण करून फिर्यादीचे पॅन्टचे खिश्यात १७ हजार रुपये रोख रक्कम असलेले पैशाचे पाकिट काढुन घेवुन तेथुन दुचाकीवरून पळुन गेला अशा आशयाच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ७६९/२०२४ भा.द.वि कलम ३२७, ३२३, ५०४,५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यातील २९ जुन २०२४ रोजीपासून फरार असलेला आरोपी अविनाश भिकन विधाते यास गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस हेडकॉन्स्टेबल जानकीराम खेमनर, रामनाथ सानप, पोलीस अंमलदार अविनाश दुधाडे यांनी त्याचा शोध घेऊन दि.७ जुन २०२५ रोजी ४ वाजेच्या दरम्यान अटक करण्यात आली आहे.

राहुरी न्यायालय यांनी सदर आरोपी यास दि. ९ जुन २०२५ रोजी पोलीस कोठडी सुनाविण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस जानकीराम खेमनर हे करत आहे.

---

# जामखेड महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी पुराने

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी डॉ. सुनिल पुराणे यांची संस्थेने नियुक्ती केली. याबद्दल जामखेड येथील काका ग्रुपच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.

डॉ. सुनील पुराणे हे १९९१ पासून जामखेड महाविद्यालयात गणित विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहे. त्यांनी पुणे विद्यापीठामधून एम.एससी. व पीएच.डी. प्राप्त केलेली आहे तसेच २००८ मध्ये एम. फिल. प्राप्त केली आहे.

महाविद्यालयामध्ये त्यांनी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी, नॅक समन्वयक, पुणे विद्यापीठाच्या गणित बोर्डात अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून २०१८ ते २०२३ पर्यंत काम पाहिले आहे. नेहमीच विद्यार्थी आणि महाविद्यालयाच्या विकासामध्ये त्यांनी मोलाचे कार्य केलेले आहे. महाविद्यालयामध्ये अनेक वृक्षारोपन करून महाविद्यालयाचा परिसर हिरवागार केला आहे.



यावेळी वसंतराव राळेभात, अविनाश फलके, डॉ. सुनिल नरके, राजेंद्र ढवळे, प्रा. बाळासाहेब पुराणे, तुकाराम अंदुरे, सोमनाथ तनपुरे, राजेंद्र शिरोळे, सचिन लोहकरे, राजेंद्र दराडे, संतोष बोबडे, प्रा. केशव कोल्हे, नामदेव भोसले, अच्युत शिंदे, विजय डोंगरे, मिठूलाल नवलाखा, बाळासाहेब वराट, भगवान समुद्र, दिपक ढवळे, संभाजी खोटे आदी उपस्थित होते.

काका ग्रुप सतत सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने एकत्र येऊन सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, शासकीय विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करत आहे. गुणवंत विद्यार्थी यांचा गुणगौरव व गरजु विद्यार्थ्यांना मदत, असे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात.

# खरवंडी-अकोला रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे?

## विभागीय आयुक्त यांनी दिले कार्यकारी अभियंता यांना चौकशीचे आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी ते जवळवाडी अकोला रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याची तक्रार माहिती अधिकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र जायभाये यांनी मुख्यमंत्री सचिवालयाकडे केली आहे. त्या तक्रारीची दखल घेत विभागीय आयुक्त नाशिक यांनी कार्यकारी अभियंता यांना चौकशीचे आदेश दिले आहेत.

शैलेंद्र जायभाये यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, पाथर्डी तालुक्यातील खरवंडी ते जवळवाडी अकोला रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. या रस्त्याची तत्काळ क्वालिटी कंट्रोल व बाह्य यंत्रणेकडून आमच्या समक्ष पाहणी करून सखोल बारीक चौकशी करण्यात यावी व चुकीचे काम करणाऱ्या ठेकेदारावर शासनाची दिशाभूल केली म्हणून फौजदारी स्वरुपाची कायदेशीर कारवाई करावी.



जोपर्यंत या कामाची क्वालिटी कंट्रोलकडून सखोल बारीक चौकशी होत नाही, तोपर्यंत ठेकेदाराची कोणतेही देयके अदा करू नये. तसेच ठेकेदाराचे देयके थांबून सदरच्या ठेकेदारास कायम स्वरूपी ब्लॅक लिस्ट करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी.

### आयुक्तांकडून चौकशीचे आदेश

चौकशी होण्याआधी या ठेकेदाराचे देयके अदा केल्यास मोठे जन आंदोलन करण्यात येईल, याची नोंद असावी, अशी मागणी माहिती अधिकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष जायभाये यांनी केली होती. त्या अनुषंगाने विभागाय आयुक्त यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

---

# राज्य अनुसूचित जमाती आयोग स्थापनेचा ऐतिहासिक निर्णय

## वैभवराव पिचड; पिचडांकडून मुख्यमंत्री फडणवीस व आदिवासी विकास मंत्र्यांचे कौतुक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** राज्य शासनाने आदिवासी समाजासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ३ जून रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल माजी आमदार, भाजपच्या अनुसूचित जमाती मोर्चाचे राष्ट्रीय मंत्री वैभवराव पिचड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उइके यांचे अभिनंदन केले आहे.

राज्यातील आदिवासी समाजाच्या न्याय्य हक्काचे हक्क रक्षण करणारा तसेच या समाजाच्या प्रगतीला दिशा देणारा हा निर्णय असल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी विकास परिषदेसह विविध आदिवासी संघटनांनी या निर्णयाचे स्वागत केले असून त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्वाखालील महायुती सरकारचे आभार मानले आहेत. आ. पिचड म्हणाले की, हा निर्णय केवळ एक प्रशासकीय पाऊल नसून एक कोटी २५ लाख आदिवासी बांधवांच्या हक्कांचा आणि स्वाभिमानाचा नवा अध्याय आहे. सन २००४ मध्ये भारत सरकारने ८९ वी घटना दुरुस्तीद्वारे अनुच्छेद ३३८-अ नुसार राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग स्थापन केला. त्याच धर्तीवर, गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात स्वतंत्र आदिवासी आयोग स्थापनेची मागणी सुरू होती. अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमसारख्या संस्थांनी यावर सातत्याने भूमिका मांडली.



राज्य शासनाने उचललेले हे आदिवासींसाठी नवा युगारंभ स्वतंत्र समाजासाठी अमूल्य भेट ठरले आहे. या निर्णयामुळे आदिवासी समाजाला न्याय, सन्मान आणि सहभाग यांचा त्रिसूत्री आधार मिळणार आहे. हे एक मैलाचा दगड असून, राज्याच्या सामाजिक समावेशकतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल आहे.

**– वैभवराव पिचड, माजी आमदार**

### गंभीर प्रकरणांवर उपाययोजना राबविणार

अनुसूचि जमातींच्या हक्कांचे रक्षण, अन्यायाविरुद्ध शिफारसी. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकासासाठी योजना व सल्ला. संस्कृती, भाषा, परंपरेचे संरक्षण व संवर्धन. बोगस समाजाच्या प्रश्नांवर तात्काळ आणि प्रभावी प्रमाणपत्र, धर्मांतर, व इतर गंभीर प्रकरणांवर उपाययोजना राबवता येणार आहे.

# 'विश्वविनायक'च्या वर्धापन दिनी डख यांचे मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असताना, वाढती खर्चिकता, बदलते हवामान आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांपुढे सतत संकट उभे राहते. अशा स्थितीत विश्वविनायक मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पाथर्डी शाखा, आपल्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त शेतकऱ्यांसाठी एक नाविन्यपूर्ण सामाजिक उपक्रम राबवत आहे.

उद्या, ११ जून रोजी सकाळी वाजता, भांडकर कॉम्प्लेक्स, श्री स्वामी समर्थ शाळेजवळ, पाथर्डी येथे एक विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात हवामान तज्ञ व लाखो शेतकऱ्यांचे श्रद्धास्थान, पंजाबराव डख साहेब स्वतः उपस्थित राहून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. हवामान, पाऊस, उत्पादन आणि बाजारभाव यांचे अचूक विश्लेषण, पंजाबराव डखच्या अनुभवातून शेतकऱ्यांना मिळणार आहे. डख त्यांच्या खास अंदाज व शास्त्रशुद्ध अभ्यासातून खरीप हंगाम ाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना उपयुक्त मार्गदर्शन करणार आहेत. शासकीय योजनांची माहिती, हवामानाचे अंदाज, पीक निवड आणि शाश्वत शेतीबाबत योग्य दिशा देणारा हा साक्षात्कार होणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विश्वविनायक मल्टीस्टेट केवळ आर्थिक सेवांपुरती मर्यादित न राहता शेतकरी केंद्रित सामाजिक बांधिलकीही जपते आहे.




# जान्हवी दिसणार गंभीर भूमिकांमध्ये

चित्रसृष्टीत काही काळ घालवल्यानंतर आणि कारकिर्दीत महत्त्वाचा टप्पा गाठल्यानंतर जान्हवी कपूर आता गंभीर भूमिका साकारण्याचा प्रयत्न करत आहे. अलिकडेच, 'होमबाउंड' मधील तिच्या भूमिकेचे 'कान्स चित्रपट महोत्सवात' बरेच कौतुक झाले. जान्हवी याचे श्रेय दिग्दर्शक नीरज घेवन यांना देते. भविष्यातही या दिग्दर्शकासोबत काम करण्याची इच्छा आहे, असे ती स्पष्ट करते.

ती पुढे म्हणते, 'होमबाउंड'चे चित्रीकरण पूर्ण केल्यानंतर मी नीरज घेवन सरांना एक संदेश पाठवला आणि म्हटले की, तुमच्या पुढच्या चित्रपटात मला एखाद्या झाडाची भूमिका करायला मिळाली तरी काही हरकत नाही. मला फक्त तुमच्याबरोबर काम करायचे आहे.' जान्हवीचा विश्वास आहे की, नीरज घेवन यांच्या चित्रपटाचा भाग असणे ही एखाद्या अभिनेत्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

'होमबाउंड' मध्ये पोलिसात नोकरी करू इच्छिणाऱ्या दोन मित्रांची कथा आहे. यासाठी ते गाव सोडतात पण अखेरीस ध्येयाजवळ येताच त्यांच्यात अनेक गोष्टी बदलू लागतात. या चित्रपटात ईशान खट्टर आणि विशाल जेठवा दोन मित्रांच्या भूमिकेत आहेत तर जान्हवी एका महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. 'कान्स फिल्म फेस्टिव्हल'मध्येही या चित्रपटाला उभे राहून दाद मिळाली. जान्हवी कपूरचा पुढचा चित्रपट 'परम सुंदरी' हा आहे. या चित्रपटात ती सिद्धार्थ मल्होत्रासोबत दिसणार आहे. त्याचबरोबर जान्हवी 'सनी संस्कार की तुलसी कुमारी' नावाचा चित्रपटही करत आहे. याशिवाय ती पुढील वर्षी प्रदर्शित होणाऱ्या 'पेड्डी' नामक दक्षिणेकडील चित्रपटातही दिसणार आहे. या चित्रपटात ती राम चरणबरोबर दिसेल.



# 'कान्स'चे सूप वाजले

भारतासाठी यंदाचा 'कान्स चित्रपट महोत्सव' ऐतिहासिक ठरला. भारतातील अनेक सेलिब्रिटींनी यात सहभाग घेतला. ऐश्वर्या रायने 'कान्स' मध्ये आपले आकर्षण कायम असल्याचे दाखवले. 'होमबाउंड' चे प्रमोशन करणारी जान्हवी कपूर चर्चेत आली. शर्मिला टागोर यांनी 'कान्स'मध्ये सत्यजित रे यांच्या 'अरण्यार दिन रात्री' च्या स्क्रीनिंगला हजेरी लावली. एकंदरच या सोहळ्यात भारतीय कलावंतांची मोठी चर्चा झाली. या फेस्टिव्हलमध्ये ऐश्वर्या रायने पांढऱ्या रंगाची साडी नेसून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले. साडीबरोबरच तिच्या सिंदूरचीही खूप चर्चा झाली. शर्मिला टागोर यांनी महोत्सवात हिरवी साडी नेसली होती. मुलीबरोबर त्या 'कान्स'ला पोहोचल्या होत्या.

यावेळी आलिया भट्टने 'कान्स'मध्ये पदार्पण केले. तिच्या फुलांच्या भरतकामाच्या ड्रेसने सगळ्यांचेच लक्ष वेधून घेतले. तिची हेअरस्टाईल अनेकांना खूप आवडली. तिच्याबरोबर यावेळी जान्हवी कपूरनेही कान्स फिल्म फ ` स्टिव्हलमध्ये पदार्पण केले. तिच्या ड्रेसचेही खूप कौतुक झाले. तिने गुलाबी रंगाचा लेहेंगा कुर्तीसारखा ड्रेस घातला होता.

या सगळ्यांबरोबर आदिती राव हैदरीनेही 'कान्स'मध्ये हजेरी लावलेली दिसली. तिने लाल रंगाच्या साडी नेसली होती. यंदाचा ७८ वा कान्स चित्रपट महोत्सव १३ मे ते २४ मे दरम्यान फ्रान्समध्ये आयोजित करण्यात आला होता. यात 'होमबाउंड' ला खूप कौतुक मिळाले. अभिनेते आणि दिग्दर्शक अनुपम खेर यांचा 'तन्वी द ग्रेट' हा चित्रपटही येथे दाखवण्यात आला. त्यालाही चांगली पसंती मिळाली.



# ट्रेंड जपणारा 'द ज्ञानवापी रिपोर्ट'

आजकाल चित्रपट निर्माते बॉलीवूड चित्रपटांमधून ऐतिहासिक घटनांवर आधारित मुद्दे मांडताना दिसत आहेत. 'द काश्मीर फाइल्स' सारख्या चित्रपटांच्या यशानंतर, हा ट्रेंड वाढत आहे. 'द केरळ स्टोरी', 'द साबरमती रिपोर्ट' सारख्या चित्रपटांनाही प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या पार्श्वभूमीवर आता विजय राजचा 'द ज्ञानवापी फाइल्स: अ टेलर मिस्ट्री स्टोरी' चर्चेत आहे.



या चित्रपटात विजय राज मुख्य भूमिकेत दिसणार आहे. खास गोष्ट म्हणजे चित्रपट खऱ्या घटनेवर आधारित असून पोस्टर प्रदर्शित झाल्यापासूनच त्याबाबत उत्सुकता वाढली आहे. अभिनेता विजय राजने अनेक विनोदी शैलीतील चित्रपटांमध्ये काम केले असून गंभीर पात्रांची भूमिका उत्कृष्ट पद्धतीने कशी साकारायची हे जाणणाऱ्या निवडक कलाकारांच्या यादीत त्याचे नाव समाविष्ट होते. अलिकडेच निर्माते अमित जानी यांनी उदयपूरचे खासदार मन्नालाल रावत यांना ट्रेलर दाखवला आणि चित्रपटासाठी पाठिंबा मागितला. त्यांनी चित्रपटाला पूर्ण पाठिंबा असल्याचे म्हटले आहे. यात कन्हैयालालची भूमिका विजय राज यांनी साकारली असून 'धमाल', 'वेलकम' आणि 'गंगूबाई काठियावाडी' सारख्या चित्रपटांमध्ये उत्कृष्ट काम बघितल्यानंतर आता या चित्रपटातही त्याची तेवढीच तगडी भूमिका बघायला मिळेल, अशी रसिकांना अपेक्षा आहे. 'ज्ञानवापी फाइल्स'चे दिग्दर्शन करण्याची जबाबदारी भरत एस. यांनी पेलली असून कथा जयंत सिन्हा यांची आहे.

हा चित्रपट समाजातील कट्टरपंथी मानसिकता आणि अपयशांवर तीव्र हल्ला करतो. मुख्य म्हणजे कन्हैयालालच्या कुटुंबालाही चित्रपटाच्या कमाईतील काही वाटा दिला जाणार आहे. ही आगळी बाब म्हणावी लागेल. २७ जून रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटातील सर्व कलाकार आणि निर्मात्यांनी प्रमोशनमध्ये आपली मते व्यक्त केलेली आपण पाहिली. आता त्याला रसिक कसे स्विकारतात ते लवकरच कळेल.

# आमिर पुन्हा येणार



मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून प्रसिद्ध असणारा आमिर खान त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे नेहमीच चर्चेत असतो. या वर्षाच्या सुरुवातीला त्याने गौरी स्प्राटसोबतच्या त्याच्या नात्याची पुष्टी करून चाहत्यांना आश्चर्यचकित केले. तेव्हापासून दोघांना अनेक वेळा एकत्र पाहिले गेले असले तरीही ते आपले खाजगीपण जपताना दिसतात.

आता गौरी आमिरच्या कुटुंबात आणि त्याच्या मुलांमध्ये मिसळत आहे. अलिकडेच ती आमिरचा मुलगा आझादसोबत जेवण करताना दिसली. एका कौटुंबिक मेळाव्यावेळी दिसलेल्या या दृश्याची सोशल मीडियाने बरीच चर्चा रंगवली. या तिघांचे काही व्हिडिओ आणि फोटो इंटरनेटवर व्हायरल होत असून त्यामध्ये ते अतिशय चांगल्या मूडमध्ये दिसत आहेत.

या कार्यक्रमासाठी आमिर गर्लफ्रेंड गौरी स्प्राटबरोबर आई झीनत हुसेनच्या घरी गेला होता. तेथे त्याने बहीण निखत आणि कुटुंबासह दिवस साजरा केला. या लंच आउटिंगमध्ये आमिर खान नेहमीप्रमाणे साध्या शैलीत दिसला. त्याची प्रेयसी गौरी आणि मुलगा आझाद यांचाही आमिरसारखा साधा लूक होता. आझाद आमिर आणि किरण राव यांचा मुलगा आहे.

आमिर खानने आपल्या ६० व्या वाढदिवसानिमित्त माध्यमांना मैत्रीण गौरी स्प्रेटची औपचारिक ओळख करून दिली होती. आमिरने खुलासा केला की, तो आणि गौरी २५ वर्षांपूर्वी भेटले होते पण नंतर त्यांचा संपर्क तुटला. काही वर्षांपूर्वी ते पुन्हा एकत्र आले आणि गेल्या १८ महिन्यांपासून एकत्र आहेत. गौरी आधी बेंगळुरूमध्ये राहत होती. तिचे यापूर्वीही लग्न झाले असून सहा वर्षांचा मुलगा आहे. आमिर खान आता 'सितारे जमीन पर' या चित्रपटाद्वारे मोठ्या पडद्यावर पुनरागमन करण्यास सज्ज आहे. या चित्रपटात आमिर बरोबर जेनेलिया डिसूझा मुख्य भूमिकेत दिसेल.

# अखेर प्रतिक्रिया आली

बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन सोशल मीडियावर खूपच सक्रिय असतात. अलिकडेच त्यांनी इंस्टाग्रामवरील आपल्या पोस्टमध्ये भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनल्याबद्दल कौतुक केले. अग्निवीरांना प्रोत्साहन देताना त्यांनी भारतीय सैन्यालाही सलाम केला. येत्या अडीच ते तीन वर्षांत भारत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याची अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

बिग बी यांनी पोस्टची सुरुवात 'जय हिंद' आणि तिरंगा इमोजीने केली. पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. अमेरिका, चीन, जर्मनी आणि आता भारत. पुढील अडीच ते तीन वर्षांत भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. सर्व देशांच्या जीडीपीचा उल्लेख करताना त्यांनी लिहिले आहे की अमेरिका ३०.५१ ट्रिलियनच्या जीडीपीसह, चीन १९.२३ ट्रिलियनच्या जीडीपीसह, जर्मनी ४.७४ ट्रिलियनच्या जीडीपीसह आणि भारत सुमारे चार ट्रिलियनच्या जीडीपीसह जगावर राज्य करण्यास तयार आहे.



पुढच्या पोस्टमध्ये, बिग बी यांनी भारतीय सैन्य आणि अग्निवीरांना सलाम केला. यावेळी त्यांनी भारतीय सैनिकांच्या दोन छायाचित्रांचा कोलाज शेअर केला असून यामध्ये एका छायाचित्रावर 'अग्निवीर' हा शब्द लिहिला आहे. या फोटोसोबत बिग बींनी कॅप्शनमध्ये लिहिले की, 'अग्निवीर जिंदाबाद. जय भारत माता की. जय हिंद.' यासोबतच त्यांनी तिरंग्याचा इमोजीही शेअर केला.

याशिवाय एका पोस्टमध्ये बिग बी यांनी वडील आणि देशातील दिग्गज कवी हरिवंश राय बच्चन यांच्या काही ओळी शेअर केल्या. आधी ऑपरेशन सिंदूरबाबत अनेक दिवस कोणतीही प्रतिक्रिया न दिल्याने लोकांचे त्यांना लक्ष्य केले होते.

# स्पर्धक अनेक, 'मिशन...' एक



हॉलिवूडचा सुपरस्टार टॉम क्रूझ दमदार अभिनयामुळे लोकांच्या मनावर राज्य करतो. त्यांचे चित्रपट जगभर नावाजले जातात. स्विकारले जातात. चित्रपटप्रेमींना त्याचे ॲक्शनपट पहायला प्रचंड आवडतात. थोडक्यात हा अभिनेता भारतातही खूप लोकप्रिय आहे. सध्या तो 'मिशन इम्पॉसिबल द फायनल रेकनिंग' मुळे चर्चेत असून अलिकडेच त्याचा प्रीमियर कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्येही झाला.

'मिशन इम्पॉसिबल ८' ने पहिल्याच दिवशी भारतात विक्रमी कमाई केली होती. यासह या चित्रपटाला भारतातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या हॉलिवूड चित्रपटांच्या यादीत स्थान मिळाले. दुसऱ्या दिवशीही चित्रपटाने चांगला गल्ला जमवलेला दिसला. हा ॲक्शन फ्रँचायझीमधील शेवटचा चित्रपट असल्यामुळे लोकप्रिय शिगेला पोहोचलेली बघायला मिळाले.

या चित्रपटाने भारतात पहिल्या दिवशी १६.५० कोटी रुपयांची कमाई केली. दुसऱ्या दिवशी कमाईचा आकडा १७ कोटी रुपयांवर पोहोचला. पहिल्या आठवड्याबद्दल बोलायचे झाले तर, चित्रपटाने ५४.४ कोटी रुपये कमावले. दुसऱ्या आठवड्यात प्रवेश केल्यानंतर चित्रपटाच्या कमाईचा आलेख पुन्हा एकदा वरच्या दिशेने जाताना बघायला मिळाला.

'मिशन इम्पॉसिबल ८' ला आठवड्याच्या शेवटीही पूर्ण फायदा मिळालेला दिसला. त्यावेळी त्याने सात कोटींची कमाई केली. यानंतर रविवारी देखील त्याने विक्रमी संग्रह सुरू ठेवला. आत्तापर्यंत चित्रपटाने ७१.६ कोटी रुपये कमावले आहेत. त्यामुळेच लवकरच तो १०० कोटी क्लबमध्ये स्थान निर्माण करू शकेल. असे होऊन तो इतिहास रचू शकण्याची दाट शक्यता आहे. भारतातील बॉक्स ऑफिसवर कोणत्याही चित्रपटाला त्याच्या विरोधात उभे राहणे कठीण होत आहे. 'रेड २' पासून राजकुमार रावच्या अलीकडील चित्रपटापर्यंत सगळ्यांची थेट स्पर्धा 'मिशन इम्पॉसिबल ८' शीच दिसते आहे.

# अंतर असले तरी...



'अ सूटेबल बॉय' या मालिकेत ईशान खट्टरने त्याच्यापेक्षा २४ वर्षांनी मोठ्या अभिनेत्रीसोबत रोमान्स केला तेव्हा चर्चेला तोंड फुटले होते. अलिकडेच त्याने या भूमिकेबद्दलचे अनुभव सांगितले. नंतर 'द रॉयल्स' या मालिकेतही तो दिसला होता. एकंदर त्याच्या अनुभवकथनामध्ये या सगळ्याचाच समावेश होता.

त्याने २०२० मध्ये 'अ सूटेबल बॉय' मध्ये तब्बूबरोबर काम केले होते. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीमध्ये त्याची आणि तब्बूची जोडी परिपूर्ण असल्याचे त्याने म्हटले आहे. यावेळी तो म्हणाला, 'मला वाटतं याचे श्रेय लेखनाला जाते. मला आणि तब्बूला वयातील अंतराकडे दुर्लक्ष करणाऱ्या इतर कोणत्याही कथेत बघताना थोडे विचित्र वाटले असते. पण या कथेत ते तसे वाटले नाही कारण आम्ही करत होतो त्याला लेखकाच्या उत्तम लेखनाचा भक्कम आधार होता. म्हणूनच प्रत्यक्षात अयोग्य वाटत असले तरी ते पडद्यावर योग्य वाटले.'

ईशान पुढे म्हणाला की, तो तब्बूबरोबर काम करताना चिंताग्रस्त नव्हता उलट त्याला अत्यंत सुरक्षित वाटत होते. इंटिमेट सीन्स शूट करण्यापूर्वी त्यांना कधीही तयारी करावी लागली नाही किंवा त्याबद्दल बोलावेही लागले नाही. तो म्हणाला, 'ती अत्यंत समजूतदार अभिनेत्री आहे तसेच खूप खोडकरही आहे. म्हणूनच सेटवर एखाद्या मुलासारखी वाटते'.

तो पुढे म्हणाला, 'सेटवर ती मस्करी करायची पण अचानक या पात्रासारखी व्हायची. तिचे असे भूमिकेत शिरताना बघणे खूप मजेदार होते. तिच्यासोबत काम करायला खूप मजा आली. कोणताही प्रसंग जिवंत कसा करावा, हे मला तिचे काम बघून शिकता आले. काहीही न बोलता तुम्ही चांगला संवाद कसा साधू शकता, याचे धडे गिरवता आले. तब्बू बरोबर असेल तर सगळं अगदी सहजतेने घडतं. जणू काही आपण तिच्याशी डोळ्यांनी संवाद साधू शकतो.' आता नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणारा 'अ सूटेबल बॉय' विक्रम सेठ यांच्या त्याच नावाच्या कादंबरीवर आधारित आहे. मीरा नायर दिग्दर्शित या चित्रपटामध्ये दोघांचा सुंदर अभिनय आणि उत्तम केमिस्ट्री तुम्ही पाहू शकता.

# रीम पुन्हा रमली



रीम शेख ही टेलिव्हिजनवरील सर्वात लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक असून सध्या ती भारती सिंगच्या 'लाफ्टर शेफ्स सीझन २' या टीव्ही शोमध्ये दिसत आहे. स्वयंपाकाबरोबर मनोरंजनाचा डोस देणाऱ्या 'लाफ्टर शेफ्स २' ने छोट्या पडद्यावर धुमाकूळ घातला आहे. इथे अभिनयात तज्ज्ञ असणारे सेलिब्रिटी आपले स्वयंपाक कौशल्य दाखवत आहेत. २२ वर्षांची रीम शेख देखील या शोचा एक भाग आहे. अलिकडेच ती पुन्हा एकदा या सेटवर जखमी झाली.

तिने इंस्टाग्राम स्टोरीवर शोच्या सेटवरील स्वतःचा एक फोटो शेअर केला यामध्ये ती आरशात सेल्फी काढताना दिसत आहे. चित्रात तिने पायाला पट्टी बांधलेली दिसते आहे. यासोबत ती म्हणते, लाफ्टर शेफच्या शूटिंगनंतरची ही अगदी सामान्य गोष्ट आहे.

प्रेक्षकांना आठवत असेल की, गेल्या सीझनमध्ये तिचा चेहरा होरपळला होता. स्वयंपाक करताना चेहऱ्यावर गरम साखर पडली आणि चेहरा भाजला. यानंतर तिला आतून भीती वाटू लागली. एका मुलाखतीत भाजण्याबद्दल बोलताना ती म्हणाली, 'ते घडले तेव्हा मला खूप भीती वाटली होती. चेहऱ्यावर पडलेली गरम साखर काचेच्या तुकड्यांसारखी वाटत होती. नंतर कोणीतरी माझ्या तोंडावर पाणी फेकले. साखर चिकटू नये म्हणून पटकन ही कृती केली गेली. पण खरेतर जळलेल्या जागेवर पाणी मारु नये. यामुळे जखम आणखी चिघळली.'

रीम सध्या ठीक आहे. कुटुंबातील सगळेच सदस्य नेहमीच आपल्याबरोबर असतात, असे ती सांगते. त्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच 'तुझसे है राबता', 'तेरे इश्क में घायाळ', 'फना' आणि 'अशोक सम्राट' यासारख्या मालिकांमध्ये मी काम करु शकले, असे सांगायला ती विसरत नाही.